। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २१३ वा । शनिवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
Email-dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# श्रीनगरच्या नौगम पोलीस ठाण्यात मोठा स्फोट! ७ मृत्यू, २७ जखमी




**श्रीनगर/वृत्तसंस्था** :जम्मू काश्मिरमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. शुक्रवारी रात्री जम्मू आणि काश्मीरमधील श्रीनगर येथे एका पोलिस ठाण्यात जप्त केलेल्या स्फोटकांचा मोठा साठा स्फोटात झाला, या स्फोटोमध्ये ९ जणांचा मृत्यू झाला असून २७ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी पाच जणांची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढू शकतो.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, श्रीनगरच्या बाहेरील नौगाम पोलिस स्टेशनमध्ये झालेल्या स्फोटात नऊ जण ठार झाले आणि २७ जण जखमी झाले. अलिकडच्या दहशतवादी मॉड्यूल प्रकरणात जप्त केलेल्या स्फोटकांच्या मोठ्या साठ्यातून अधिकारी नमुने घेत असताना हा स्फोट झाला. मृत्यूंमध्ये पोलिस आणि फॉरेन्सिक अधिकारी होते. पोलिस कर्मचारी हरियाणातील फरीदाबाद येथून आणलेले स्फोटक पदार्थ हाताळत असताना हा स्फोट झाला असे त्यांनी सांगितले.

जम्मू आणि काश्मीरमधील नौगाम पोलिस स्टेशन परिसरात झालेल्या स्फोटाची चौकशी करण्यासाठी सुरक्षा दल, स्निफर डॉगसह दाखल झाले आहेत. श्रीनगरचे उपायुक्त अक्षय लाब्रू यांनी रुग्णालयात जखमींची भेट घेतली.अटक केलेल्या डॉक्टर मुझम्मिल गनई यांच्या भाड्याच्या घरातून जप्त केलेल्या ३६० किलोग्रॅम स्फोटकांचा भाग असलेल्या या साहित्याचे नमुने तपासणीसाठी घेतले जात आहेत.

शहरातील विविध रुग्णालयात किमान २४ पोलिस आणि तीन नागरिकांना दाखल करण्यात आले. या प्रचंड स्फोटाने रात्रीची शांतता भंग केली आणि पोलिस स्टेशनच्या इमारतीचे नुकसान झाले. जखमी पोलिसांना शहरातील विविध रुग्णालयात नेण्यात आले. लहान स्फोटांच्या सततच्या मालिकेमुळे बॉम्ब निकामी पथकाच्या तात्काळ बचाव कार्यात अडथळा निर्माण झाला.

# भाजपाला अधिक जागा तरी मुख्यमंत्री नितीश कुमार?



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बिहारच्या विधानसभा निवडणुकीत एनडीएला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. एनडीएने २०३ जागा जिंकल्या आहेत. दुसरीकडे महाआघाडीची कामगिरी मात्र सुमार राहिली आहे. काँग्रेसला सहा व राष्ट्रीय जनता दलाला २५ जागा जिंकता आल्या आहेत. एनडीएमध्ये आणि एकंदरित बिहारमध्ये भारतीय जनता पार्टी सर्वात मोठी पार्टी ठरली आहे. भाजपाने ८९ तर, जनता दलाने (संयुक्त) ८५ जागा जिंकल्या आहेत. लोक जनशक्ती पार्टीचे १९ उमेदवार विजयी झाले आहेत. राष्ट्रीय लोक मोर्चाला देखील चार जागांवर विजय मिळाला आहे.

दरम्यान, भाजपाने सर्वाधिक जागा जिंकल्यामुळे आता बिहारचे मुख्यमंत्रिपद कोणाला मिळणार असा प्रश्न सर्वांना पडला आहे. एनडीए पुन्हा एकदा नितीश कुमार यांना संधी देणार की भाजपा स्वतःच्या एखाद्या नेत्याला मुख्यमंत्रिपदी बसवणार याबाबत वेगवेगळी चर्चा चालू आहे. दरम्यान, नितीश कुमार यांचे निकटवर्तीय व जनता दलाचे वरिष्ठ नेते श्याम रजक म्हणाले, बिहारमध्ये मुख्यमंत्री म्हणून पुन्हा एकदा नितीश कुमार हेच शपथ घेतील.

रजक यांनी पाटणा येथे काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, मुख्यमंत्रिपदासाठी नितीश कुमार यांच्याऐवजी दुसरं कोणीच नाही. आम्ही दुसऱ्या कोणाचा विचारच केलेला नाही. मुख्यमंत्रिपदाबाबत आमचं आधीच ठरलं आहे. पुन्हा एकदा नितीश कुमारच मुख्यमंत्री होतील.

**भाजपाची भूमिका काय?**

भाजपा नेते धर्मेंद्र प्रधान यांनी निवडणुकीच्या निकालानंतर दी इंडियन एक्सप्रेसशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, एनडीए अतूट आहे. तसेच नितीश कुमार हेच एनडीए आघाडीचे नेते आहेत. दरम्यान, एनडीए अखंड आहे तर मग नितीश कुमार मुख्यमंत्री होणार का? असा प्रश्न प्रधान यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, सरकार एनडीएचंच बनणार आहे आणि नितीश कुमार हे एनडीएचे सर्वात मोठे नेते असतील.

**भाजपाकडे मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार नाही?**

भाजपाकडे मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार असायला हवा होता का? असा प्रश्न यावेळी धर्मेंद्र प्रधान यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, गोंधळ निर्माण करू नका. हा एनडीएचा स्पष्ट विजय आहे. मोदींनीही हा विजय एनडीएचा असल्याचं म्हटलं आहे. या विजयामुळे बिहारच्या विकासाला चालना मिळेल.

# लातूर जिल्ह्यात पाचच्या पाच ठिकाणी भाजपचाच नगराध्यक्ष होणार..!

## अरविंद पाटील निलंगेकर यांचा दावा

**निलंगा/आयुब बागवान :** बिहार निवडणुकीत चमत्कार देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मॅजिक लाडक्या बहिणींचा आशीर्वाद आणि केलेल्या विकासाच्या जोरावर छऊ- ने बिहार राज्य पुन्हा जनतेच्या आशीर्वादाने दणदणीत विजय मिळवला आहे. बिहार निवडणुकीचे निकाल बाहेर येताच निलंगा भाजपच्या वतीने भाजपचे नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली महा जल्लोष पक्षाचे झेंडे हातात घेत छत्रपती शिवाजी महाराजाना अभिवादन करून जेलेबी ने व्यापाऱ्यांचे तोंड गोड करण्यात आला..



प्रथमतः निलंगामध्ये बिहार विजयी बद्दल घोषणाबाजी करत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सह माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर आणि लोकसभा निवडणूक, विधानसभा निवडणूक, किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मायक्रो यंत्रणा उभी करून यश प्राप्त करून घेणारे मॅनेजमेंट गुरू अरविंद पाटील निलंगेकर यांच्या नावाशी घोषणा देण्यात आली..

लातूर जिल्ह्यातील ४ नगर पालिका आणि १ नगर पंचायतीवर भाजपचाच नगराध्यक्ष होणार असल्याचा दावा अरविंद पाटील यांनी केला. नुसता दावाच नाही तर कांग्रेस चे मराठवाडा प्रभारी तथा आमदार अमित देशमुख,महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष अशोकराव पाटील निलंगेकर, आणि कांग्रेसचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांना भाजपचे नेते अरविंद पाटील निलंगेकर यांनी दंड थोपटून ओपन चॅलेंज करत आव्हान दिला आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत लातूर जिल्ह्यातील सर्वच नगर परिषदेवर भाजपचाच कमळ फुलणार असल्याचे अरविंद पाटलांनी सांगत निलंगा नगर परिषदेवर २३ पैकी २३ नगरसेवक हे भाजपचेच राहतील आणि नगराध्यक्ष सुद्धा भाजपचाच राहील हे माझा चॅलेंज आहे. माझा नांव अरविंद पाटील आहे जनतेत मनातला विकास करण्याची ताकद आणि क्षमता निलंगेकरामध्येच असून आणि ते भाजपच जनतेचा चौफेर विकास करू शकतं असे भाजपचे नेते अरविंद पाटील निलंगेकर यांनी बिहार निकालाच्या जल्लोषात विरोधकांना दंड थोपटून ओपन चॅलेंज दिले.

## जिल्हा अध्यक्ष अभय साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत निलंगा येथे

# भाजपातील शेकडो कार्यकर्त्यांचा कॉंग्रेसमध्ये प्रवेश



**निलंगा/मोईज सितारी :** स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीमुळे सध्या पक्ष प्रवेशाचे सत्र चालू आहे.याच पार्श्वभूमीवर काँग्रेसचे जिल्हाअध्यक्ष अभय साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत बाळासाहेब सुर्यवंशी हालकी तालुका शिरूर अनंतपाळ यांनी आज शेकडो कार्यकर्त्यांसह आडीशे चारचाकी गाड्यांचा ताफाकाढून भाजपातून काँग्रेसमध्ये निलंग्यात जाहीर प्रवेश केल्याने भाजपाला मोठे भगदाड पडले आहे. निलंगा शहरातील बस्वेश्वर मंगल कार्यालयात पक्षप्रवेशाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील देवणी तालुकाध्यक्ष अजित बेळकुणे, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर पाटील, संजय बिराजदार, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अरविंद भातांब्रे, देवणी उपनगरध्यक्ष अमित मानकरी, गोविंद सुर्यवंशी, विठ्ठल पाटील आंबादास जाधव, रमेश मदरसे, बाळासाहेब पाटील, सुतेज माने, ज्ञानेश्वर पाटील,गंगाधर चव्हाण, शकील पटेल, प्रमोद भदरगे, कारखाने, युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष मदन बिरादार, बालाजी वळसांगविकर, महेश देशमुख, ॲड. तिरुपती शिंदे, ॲड. संदीप मोरे, बालाजी गोमसाळे, दिनकर बिरादार आदि प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान बाळासाहेब सूर्यवंशी यांनी अडीचशे चार चाकी वाहनांमध्ये शेकडो कार्यकर्ते आणल्याने वाहनांच्या ताफ्यामुळे निलंगा शहरांमध्ये चक्का जाम झाले होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी निलंग्याच्या आमदारानी शहरासह निलंगा मतदार सघातील विकास कामात भ्रष्टाचार केल्याचा आरोप करीत विकासाच्या गप्पा मारणारे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी ग्रामदैवत निळकंठेश्वर मंदिर जिर्णोधार कामातही भ्रष्टाचार केला असल्याचा घनगती आरोप केला. तसेच निलंगा नगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीवर काँग्रेसचा झेंडा फडकणार असल्याचा विश्वासही जिल्हाध्यक्ष साळुंके यांनी यावेळी व्यक्त केला.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**बिहारमध्ये एनडीए सरकार...**

## चिमटा दयाचा



**डीजे आवाज अंगलट येणार ! गाड्यामध्ये मोठा आवाज लावाल तर गुन्हा दाखल होणार !!**

## भारताचे प्रख्यात संगणकशास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. विजय भटकर यांची

# विश्वेश्वर शैक्षणिक संकुलास ऐतिहासीक भेट

### संकुलातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला मिळाली नवी दिशा

**औसा/प्रतिनिधी :** तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, आलमला, ता. औसा, जि. लातूर येथे दिनांक १४ नोंव्हेंबर २०२५ रोजी भारतातील संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्वोच्च व्यक्तीमत्व पद्मश्री, पद्मभुषण, महाराष्ट्र भुषण डॉ. विजय भटकर सर यांनी विश्वेश्वर शैक्षणिक संकुलास दिलेली भेट हा संस्थेच्या इतिहासातील सुवर्ण क्षण ठरला. डॉ. विजय भटकर सारख्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या व्यक्तीमत्वाने ग्रामीण भागातील संस्थेला दिलेली भेट ही संस्थेसाठी एक ऐतिहासीक भेट झाली. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्राचार्य प्रशांत धाराशिवे, डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. कैलास कापसे, प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे, शिरीष उटगे, अशिष उटगे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयातील संगणक विभागातील परम कॉम्प्युटरचे विद्याथ्र्यासाठी तयार केलेल्या ॲक्रेलिक पोस्टर डिजीटल वॉलचे उद्धाटन डॉ. भटकर यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकात संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांनी भारताचे थोर शास्त्रज्ञ, सुपर, परम कॉम्प्युटरचे जनक डॉ. विजय भटकर सर यांना विश्वेश्वरय्या इंन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाने ठेवलेल्या टेक्निकल इव्हेंन्टसाठी १२ वर्षापासुन सातत्यपुर्ण पाठपुराव्यानंतर शेवटी १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सरांनी भेटीस मान्यता देऊन विश्वेश्वर शैक्षणिक संकुलास भेट दिली त्यामुळे विद्याथ्र्यापासुन शिक्षकापर्यंत सर्वामध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाल्याचे सांगुन संस्थेने केलेल्या शैक्षणिक वाटचालीचा अहवाल व संस्थेच्या यशाचे गमक सांगुन संस्था संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्याचे काम अविरतपणे करत असल्याचे सांगितले. तसेच संस्थेच्या शैक्षणिक प्रवासाला नवी दिशा व नवा वेग मिळाला. संकुलातील सर्व विद्याथ्र्यासाठी नक्कीच हा दिवस जिवनातील सर्वात मोठा प्रेरणादायी असेल असे सचिव म्हणाले.



पद्मश्री डॉ. विजय भटकर यांनी बोलताना संस्थेला मिळालेले यश पाहुन आनंद व्यक्त केला व ही संस्था महाराष्ट्रातील एक आदर्श संस्था म्हणुन उभी रहावी ही माझी इच्छा आहे असे मत व्यक्त केले. ग्रामीण भागातील विद्यार्थी जिद्द व प्रामाणिक परिश्रमाच्या जोरावर जगाच्या पातळीवरील यश संपादन करू शकतात हे या विश्वेश्वर संस्थेने दिलेल्या संधीचा वापर करून विद्यार्थ्यांनी यश संपादन केले ही खरोखरच गौरवास्पद गोष्ट असल्याचे नमुद केले. त्यांच्या या शब्दांनी उपस्थितांच्या मनात नवा आत्मविश्वास निर्माण झाला. डॉ. भटकर यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, नवोन्मेष, संगणकाचे भविष्य, भारतातील संशोधन क्षेत्राची गरज आणि तरूणांनी घ्यावयाची जबाबदारी याबाबत अत्यंत उपयुक्त आणि प्रेरक मार्गदर्शन केले. यामुळे विद्याथ्र्यामध्ये उत्साह व आत्मविश्वास निर्माण झाला. तसेच अनेक इंजिनीअरिंग व फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत संवाद साधुन नवनविन समस्येवर हार न मानता प्रयत्नशिल रहा, आपोआप पुढे जाल असे विद्याथ्र्याना सांगितले. यावेळी शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. सुरज मालपाणी, प्रा. मयुरी चंद्रवंशी व्दारा लिखीत पुस्तकाचे प्रकाशन डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विश्वेश्वर संकुलातील सर्व युनिटमधील प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी व पालक मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. अंकुश बिडवे यांनी तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे यांनी केले.


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## स्वबळावर निवडणुक लढण्याकडे कार्यकर्त्याचा कल

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यात स्वबळावर निवडणुक लढव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रत्येक पक्षाला सक्षम असल्याचे जाणवत आहे. प्रत्येक पक्षाला आपल्याच यश मिळेल असे वाटत आहे. वास्तविक निवडणुका हया विविध पैलूवर लढल्या जातात. पक्षाचा विचार, पक्षप्रमुख व जनतेविषयक जवळीतकता आदि बाबीचा विचार मतदार करीत असतो. सत्तेत तीन पक्ष आहेत. सर्वाधिक भाजपाचे वर्चस्व आहे. त्याच प्रमाणे सत्तेत एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या पक्षाची साथ आहे. विरोधात उद्धव ठाकरे सह काँग्रेस व शरद पवार यांचा पक्ष आहे. या तिघांची राज्यात समसमान ताकद दिसून येते. उद्धव ठाकरे यांना मानणारा वर्ग आहे तसे शरद पवार यांचे पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात मानणारा जुना वर्ग आहे. काँग्रेसचे नेतृत्व मजबुत माणसाच्या हाती असणे आवश्यक असते. ते दिसून येत नाही. ग्रामीण भागात काँग्रेसला मानणारा जुना वर्ग आहे. परंपरागत काँग्रेसवर प्रेम करणारी मंडळी आहे. मजबुत असा नेता मिळाला तर काँग्रेसला पुर्नवैभव मिळू शकेल. त्याच प्रमाणे राज्यात बऱ्याप्रमाणात यश मिळू शकेल. आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कोणत्याच पक्षात एकजुट अजूनतरी झाली नाही. मुळात मुंबई महानगर निवडणुकीपुर्वी मनसे व उद्धव ठाकरे एक होतील असे वाटत नाही. उद्धव ठाकरे जर मनसेकडे झुकले तर काँग्रेस स्वतंत्र लढेल असा ईशारा दिला आहे. त्यामुळे काँग्रेसला मनसे नको आहे असे वाटत आहे. मनसेचे वर्चस्व मुंबईत आहे. मुळात शिवसेना जी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची आहे तीचे वर्चस्व मराठी माणसाचे प्रेम शिवसेनेवर आहे. शिवसेना मुंबईत मजबुत स्थितीत आहे. अशा स्थितीत एकटे उद्धव ठाकरे किंवा राज ठाकरे यांना यश मिळणे आवघड आहे. महायुती किंवा महाआघाडीशिवाय सध्याला पर्याय दिसून येत नाही. सर्वांना युती किंवा आघाडी करूनच लढावे लागणार आहे. बऱ्याच वेळा यापुर्वी पहिल्यांदा स्वतंत्र लढतात व नंतर युती-आघाडी करतात हा अनुभव आहे. त्यामुळे आज जरी कोणी स्वतंत्र लढण्याचा विचार करीत असेल तर आगामी काळात निवडणुकीनंतर एक झाल्याचे दिसून आले आहेत. त्यामुळे आगामी काळात एक होणारे व आता युती व आघाडीस विरोध करणारे कोण आहेत हे जनता ओळखत आहे. मुळात राज्यात कोणत्याही एका पक्षाला जनता स्विकारेल असे वाटत नाही. ही बाब सर्वांना माहिती आहे. त्यामुळे एकत्र लढण्याचा विचार करणे योग्य ठरणारे आहे. एकत्र निवडणुका लढण्यात तसा कार्यकर्त्याचा विरोध का आहे तर एका गावात एकच पार्टी किंवा दोन पार्टीचे गाव असते. ते एकत्र येत नाहीत. श्रेष्टी जरी सांगत असली तरी स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते एक होत नाहीत हे उघड आहे. स्थानिकांना आपले राजकारण करण्यात स्वतंत्रता हवी असते. अजून उद्धव ठाकरे व शरद पवार यांना पक्ष व चिन्हा बाबत न्यायालयीन लढाई चालू आहे. पक्ष व चिन्ह या बाबत दिलेल्या चिन्हावरच निवडणुका लढव्यात लागणार आहेत. जानेवारीत या बाबत निकाल हाती लागणे अपेक्षित आहे. शरद पवार व अजित पवार एकत्र येणार असा सुर मध्यंतरी दिसून येत होता. त्याच प्रमाणे मनसे व उद्धव एकत्र येणार अशीही चर्चा होती ती प्रत्यक्षात दिसून येत नाही. केवळ चर्चाच दिसून येत आहे. त्यामुळे राज्यात तीन पक्ष सत्तेत व तीन पक्ष विरोधात आहेत हे उघड आहे. आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत तिघे-तिघे एकत्र येतीलच असे नाही. निवडणुका निकालानंतर ते एकत्र येतील मात्र अगोदर एकत्र येऊन लढतील असे वाटत नाही. सर्वांना स्वतंत्र लढण्यात फायदा होईल असे वाटत आहे. आता स्वतंत्र लढण्याचे व यश मिळेल असे वाटणे चुकीचे ठरणारे आहे. पुर्वीची स्थिती वेगळी होती. विरोधक मजबुत नव्हते. आता विरोधकांची स्थिती सर्व बाबतीत मजबुत आहे. अशा स्थितीत केवळ स्थानिक कार्यकर्त्यास अपेक्षा आहे. याचा विचार पक्षप्रमुख करतील. विचार केला तरी यश किती प्रमाणात मिळेल हे सांगणे कठिण आहे. राज्यात वरचेवर काँग्रेसची स्थिती ढासळत आहे. अनेक कार्यकर्ते काँग्रेसच्या जीवावर मोठे झाले आहेत. आज काँग्रेसची स्थिती मजबुत नाही म्हणून ते सोडून जात आहेत. तसे पाहिले तर बुडत्या जहाजमध्ये कोणी बसण्यात तयार नसते. तीच स्थिती सध्याला दिसून येते. राज्यात विरोधात उद्धव ठाकरे यांचा पक्ष अधिक सक्षम आहे. राष्ट्रवादी विभागली आहे. सत्ताधारी अजित पवार असल्यांने त्यांच्याकडे मोठे कार्यकर्ते दिसून येतात. शरद पवार यांच्याकडे निष्ठावंताची संख्या बरी आहे. ते आजही मजबुत स्थितीत लढत आहे. वयोमान झाले तरी ते पक्षाचे काम पाहात आहेत. त्यामुळे अजित पवार तसे कोणत्यावेळी निर्णय घेतील हे सांगता येत नाही. सर्वात उद्धव ठाकरे यांना अधिक मेहनत घ्यावी लागते. उद्धव ठाकरे यांचे सच्चे सोबती सोबत नाहीत. त्याचा परिणाम होणार आहे. खोके, गद्दार असे वारंवार उद्गार काढल्याने अधिक मंडळी नाराज झालेली आहे. उद्धव ठाकरे यांनी नाराज एकनाथ शिंदेला जर जवळ केले असते तर आज मुंबई महानगरपालिकेची निवडणुकीत सहज यश मिळविता सोपे झाले असते. निवडणुका ह्या सत्ताधाऱ्यास आवघड जात नाहीत. विरोधकांना कठिण जात असतात हा अनुभव सर्वांना आहे. त्यामुळे विरोधकांना आज जरी एकी नको वाटत असली तरी आगामी काळात त्याच्याशिवाय पर्याय नाही हे उघड आहे. मुळात राज्यात सहापक्ष कार्यरत आहेत. त्या सर्वांना निवडणुकीत यश मिळेल अशी आशा आहे. त्यामुळे आज जरी स्वतंत्र लढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असली तरी तशी तयारी निवडणुक जिंकण्याची असणे आवश्यक आहे. मतदार आता हुशार झाला आहे. पक्षा पेक्षा आपल्या मदतीस धाऊन येणाऱ्या व्यक्तीस मते मिळतात. त्यामुळे आता पक्षा बरोबर चांगल्या व्यक्तीला मतदार निवडत असल्याने दोन्ही बाबी पाहून काम करावे लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणुक ही पाया आहे. ती जर मजबुत असेल तर पुढील विधान व लोकसभेत अधिक परिश्रमाची गरज नाही. त्यामुळे सर्वात महत्वाच्या निवडणुका ह्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आहेत. त्यामुळे स्वतंत्र लढण्याची बाबीचा विचार धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे युती व आघाडी करणे श्रेष्टींना फायद्याचे आहे.

# बिरसा मुंडा : भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील दीपस्तंभ



भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत ज्यांचे योगदान केवळ संघर्षापुरते मर्यादित नसून त्यांनी एका समाजाला, एका संस्कृतीला आणि एका युगाला नवसंजीवनी दिली. त्यात 'धरती आबा' म्हणून ओळखले जाणारे महान क्रांतिकारक, सामाजिक सुधारक व जननायक बिरसा मुंडा हे नाव आदराने उच्चारले जाते. १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील छोटानागपूर पठारातील उलिहातू या छोट्याशा गावात जन्मलेल्या या महान योद्ध्याने केवळ आदिवासींच्या अधिकारांसाठी लढा दिला नाही, तर भारतदेशाच्या स्वातंत्र्यलढ्यातही आपले महत्वपूर्ण योगदान दिले आहे. यंदा आपण त्यांच्या १५०व्या जयंतीचा उत्सव साजरा करीत आहोत. हा केवळ स्मरणाचा क्षण नाही, तर त्यांचा आदर्श, विचार आणि लढ्याच्या परंपरेचा पुनर्जागरण करण्याचा अवसर आहे.

बिरसा मुंडा हे ज्या काळात जन्मले, तो काळ भारतावर ब्रिटिशांच्या वर्चस्वाचा होता. ब्रिटिशांनी देशातील जनतेला राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या जखडून ठेवले होते. विशेषतः झारखंड, ओडिशा, बिहार या भागातील आदिवासी समाजावर ब्रिटिश शासन, जमींनदार आणि महाजन त्रिकूटाने अत्याचाराचा डोंगर कोसळवला होता. त्यांच्या जमिनी हिसकावल्या जात होत्या, पिढ्यानपिढ्या शेती करून उपजीविका करणारे हे लोक बेघर होत होते, आणि त्यांना गुलामगिरीच्या गर्तेत ढकलले जात होते. अशा अंधकारमय परिस्थितीत या समाजाच्या हृदयातून एक ज्वाला पेटली होती आणि ती ज्वाला होती बिरसा मुंडांची.

बालपणापासूनच बिरसांना अन्यायाविरुद्ध तीव्र असंतोष होता. त्यांनी आपल्या आजूबाजूच्या समाजात शोषण, दारिद्र्य, निरक्षरता, अंधश्रद्धा आणि धार्मिक फसवणूक पाहिली होती. ब्रिटिश राजवटीत आदिवासींची जमीन ''सरकारी मालकीची'' घोषित करून, ती गैरआदिवासी जमीनदार व व्यापाऱ्यांना देण्यात आली होती. या अन्यायाविरुद्ध बिरसांनी आपल्या लोकांना एकत्र केले आणि एक नवे सामाजिक व राजकीय आंदोलन उभारले त्यालाच ''उलगुलान'' म्हणजेच ''महान बंड'' म्हटले जाते. हे बंड केवळ ब्रिटिशांविरुद्ध नव्हते, तर संपूर्ण अन्यायकारी व्यवस्थेविरुद्ध होते.

बिरसा मुंडा यांनी आपल्या विचारांद्वारे आदिवासी समाजात जागृती निर्माण केली. त्यांनी सांगितले की ''आपली जमीन, आपले जंगल आणि आपले पाणी हेच आपले जीवन आहे.'' त्यांनी आदिवासींना गुलामीच्या बेड्यातून मुक्त करण्यासाठी शिक्षण, आत्मनिर्भरता आणि संघटनेचे महत्त्व पटवून दिले. ''धरती आबा'' म्हणून लोक त्यांना मानू लागले, कारण त्यांनी आपल्या मातृभूमीला माता समजले आणि तिचे रक्षण करणे हेच आपला धर्म मानले. त्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने आपला स्वतंत्र धर्म, संस्कृती आणि ओळख टिकवून ठेवण्यासाठी एक व्यापक चळवळ उभारली होती.

१८९९ मध्ये बिरसा मुंडांनी छोटानागपूर प्रदेशात ''मुंडा आंदोलन'' उभारले. या आंदोलनाचे घोषवाक्य होते ''अबुआ दिशुम, अबुआ राज'' म्हणजे ''आपली जमीन, आपले राज्य.'' त्यांनी आपल्या अनुयायांना हिंसाचारापेक्षा आत्मसन्मानाची लढाई लढण्यास प्रेरित केले. ब्रिटिश सरकारच्या शोषणकारी भूमिसुधार कायद्यांविरोधात त्यांनी जमिनींचे रक्षण करण्यासाठी जनतेला संघटित केले. या बंडाने ब्रिटिश सरकार हादरून गेले. बिरसा मुंडा हे केवळ स्थानिक नायक राहिले नाहीत, तर ते भारतातील पहिल्या स्वातंत्र्यवीरांच्या श्रेणीत स्थान मिळवून गेले.

बिरसांच्या विचारसरणीत समाजसुधारणेचे तत्त्वही स्पष्ट दिसते. त्यांनी आपल्या समाजातील अंधश्रद्धा, मद्यपान, जादूटोणा आणि भोंदूपणाविरुद्ध तीव्र आवाज उठवला. त्यांना वाटत होते की जोपर्यंत आदिवासी समाज स्वतःमध्ये सुधारणा घडवून आणत नाही, तोपर्यंत बाहेरील अत्याचाराला तोंड देता येणार नाही. म्हणून त्यांनी आपल्या अनुयायांना संयम, सत्य आणि परिश्रमाचे शिक्षण दिले. त्यांनी आदिवासी धर्माला एका नैतिक चौकटीत बांधून सामाजिक एकता प्रस्थापित केली.

त्यांचे विचार फक्त समाजपरिवर्तनापुरते मर्यादित नव्हते तर त्यात स्वातंत्र्याचा गाभा होता. त्यांनी सांगितले की ''इंग्रज सरकार ही आपल्या भूमीवरील परकी सत्ता आहे आणि तिचे उच्चाटन हे आपले परम कर्तव्य आहे.'' या विचारांनी पुढील स्वातंत्र्यसंग्रामातील अनेक नेत्यांना प्रेरणा दिली. गांधीजींच्या 'सत्याग्रह' आणि 'स्वावलंबन' या तत्त्वांपूर्वीच बिरसा मुंडांनी स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेचा संदेश आपल्या लोकांना दिला होता.

१८९५ मध्ये ब्रिटिशांनी त्यांना अटक करून तुरुंगात डांबले, परंतु त्यांची क्रांतीची ज्योत विझली नाही. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी पुन्हा आपल्या अनुयायांना संघटित केले. मात्र, ब्रिटिश सरकारला त्यांचा प्रभाव सहन झाला नाही. १९०० मध्ये त्यांना पुन्हा अटक करण्यात आली आणि ९ जून १९०० रोजी रांचीच्या तुरुंगात त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला. तेव्हा त्यांचे वय फक्त २५ वर्षांचे होते. पण या तरुण क्रांतिकारकाने अल्पायुष्यात केलेले कार्य भारतीय इतिहासात अमर झाले.

बिरसा मुंडा यांच्या बलिदानाने आदिवासी समाजात नवचेतना निर्माण झाली. ब्रिटिश सरकारला अखेर ''छोटानागपूर टेनन्सी ॲक्ट'' मंजूर करावा लागला, ज्यामुळे आदिवासींच्या जमिनींचे संरक्षण झाले. हा कायदा आजही त्यांच्या लढ्याचे फलस्वरूप म्हणून ओळखला जातो. त्यांच्या आंदोलनाने भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवा सामाजिक पाया दिला गेला. स्वराज्य हा केवळ राजकीय संकल्प नाही, तर तो सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मुक्तीचाही मार्ग आहे, हे बिरसांनी दाखवून दिले.

आज बिरसा मुंडा हे केवळ एका आदिवासी समाजाचे नायक राहिलेले नाहीत; ते भारताच्या सामाजिक न्यायाच्या, समतेच्या आणि स्वाभिमानाच्या चळवळीचे प्रतीक झाले आहेत. १५ नोव्हेंबर हा दिवस आज ''जनजातीय गौरव दिन'' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ आदरांजली देण्याचा नाही, तर त्यांच्या आदर्शांवर चालण्याचा आहे. त्यांनी शिकवलेली एकता, परिश्रम, आणि स्वाभिमानाची शिकवण आजही भारताला नवी दिशा देते. त्यांचा लढा केवळ ब्रिटिशांविरुद्ध नव्हता, तर शतकानुशतके चालत आलेल्या शोषणाच्या व्यवस्थेविरुद्ध होता. त्यांनी समाजातील दुर्लक्षित वर्गांना आत्मसन्मानाची जाणीव करून दिली. आज जेव्हा आपण ''सबका साथ, सबका विकास'' याची चर्चा करतो, तेव्हा बिरसा मुंडांचे विचार त्यामागे जिवंतपणे उभे दिसतात. त्यांच्या जीवनातून आपल्याला समजते की सामाजिक न्याय आणि स्वातंत्र्य हे हातात हात घालून चालतात.

भारतीय लोकशाहीचा आत्मा म्हणजे समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता होय. बिरसा मुंडा यांनी या तीनही मूल्यांचे बीज आपल्या संघर्षातून रोवले. त्यांच्या प्रेरणेने आज अनेक आदिवासी तरुण शिक्षण, रोजगार आणि राजकारणाच्या क्षेत्रात पुढे येत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांनी त्यांच्या नावाने विद्यापीठे, संग्रहालये, स्मारके उभारली आहेत. पण खरी आदरांजली तीच, जेव्हा आपण त्यांच्या विचारांना आपल्या कृतीत उतरवू, शोषणमुक्त समाज, पर्यावरणसंवर्धन, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेची दिशा स्वीकारू.

आजच्या काळात, जेव्हा जागतिकीकरणाच्या युगात आदिवासी समाज पुन्हा आर्थिक आणि सांस्कृतिक आव्हानांना सामोरे जात आहे, तेव्हा बिरसा मुंडांचा संदेश पुन्हा नव्याने स्मरणात आणण्याची गरज आहे. त्यांनी सांगितले होते की ''धरती ही आई आहे, तिचे रक्षण हेच आपला धर्म आहे.'' हा विचार आज पर्यावरणीय संकटांच्या काळात अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्यांनी दाखवून दिले की खरी प्रगती तीच, जी निसर्गाशी सुसंवाद राखते.

बिरसा मुंडा यांचे जीवन म्हणजे क्रांती, अध्यात्म आणि सामाजिक न्याय यांचा त्रिवेणी संगम होते. त्यांचा संघर्ष हे दाखवतो की एका तरुणाच्या धैर्याने संपूर्ण व्यवस्था हादरवता येते, जर त्याच्या मनात जनतेसाठी प्रेम आणि न्यायाची ज्वाला असेल तर. त्यांनी आपल्या अल्पायुष्यात जे कार्य केले, ते आजही भारतीय समाजासाठी प्रेरणादायी आहे.

अखेर, बिरसा मुंडा हे केवळ एक ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व नाहीत, तर ते भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रवाहातील जिवंत प्रतीक आहेत. त्यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आपण त्यांना केवळ स्मरणात ठेवू नये, तर त्यांच्या आदर्शांनुसार वर्तन करावे. कारण बिरसा मुंडा म्हणजे स्वाभिमानाची मूर्ती, अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचे प्रतीक आणि भारताच्या आत्म्याचा निखळ दीपस्तंभ होते. त्यांचा विचार भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात सदैव दीपस्तंभासारखा उजळत राहील. देशासाठी, समाजासाठी, आणि प्रत्येक त्या माणसासाठी जो न्याय आणि समानतेसाठी झगडत आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. ९९६०१०३५८२

# राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेमध्ये कार्तिक हंकारले यास सुवर्णपदक

## भुसणी गावचा भूमिपुत्र राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र

**औसा/प्रतिनिधी :** :औसा तालुक्यातील भुसणी गावचा भूमिपुत्र, कार्तिक हंकारले याने पुणे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून औसा तालुक्याचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात गाजवले आहे. वीर हनुमान व्यायामशाळेचा खेळाडू असलेल्या कार्तिकच्या या यशामुळे त्याला आता थेट राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी पात्रता मिळाली आहे.

पुणे येथे झालेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत विविध जिल्ह्यांतील नामांकित खेळाडू सहभागी झाले होते. काट्याच्या चुरशीच्या लढतीत कार्तिकने आपल्या दमदार कौशल्य, वेगवान डावपेच आणि चिकाटीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत सुवर्णपदक आपल्या नावावर केले. त्याच्या उत्कृष्ट प्रदर्शनाने परीक्षक आणि प्रेक्षकांची दाद मिळवली.कार्तिकचा हा विजय केवळ त्याचाच नाही, तर भुसणी ग्रामस्थ, औसा तालुका आणि वीर हनुमान व्यायामशाळेचा



अभिमान आहे. लहानपणापासूनच खेळाची आवड जोपासत कार्तिकने सतत मेहनत, शिस्त आणि समर्पणाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.

स्थानिक प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्याने ज्युदो या खेळात आपली छाप पाडली असून त्याचे राष्ट्रीय पातळीवर प्रवेश हे त्याच्या चिकाटीचे फळ आहे.या यशाबद्दल कार्तिकचे पालक, प्रशिक्षक आणि ग्रामस्थांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले. सामाजिक माध्यमांवर त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून औसासह लातूर जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी त्याच्या या यशाचे स्वागत केले आहे.कार्तिक हंकारलेसारखे तरुण खेळाडू ग्रामीण भागातील युवकांसाठी प्रेरणादायी आहेत. त्याच्यातील मेहनतीचा आत्मा आणि यशाची जिद्द अनेकांना प्रोत्साहन देणारी ठरेल, असे मत स्थानिक क्रीडा क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केले.आता सर्वांचे लक्ष कार्तिकच्या राष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरीकडे लागले आहे. त्याने राज्यस्तरीय पातळीवर जशी दमदार कामगिरी केली, तशीच झुंज राष्ट्रीय स्तरावरही देऊन देशभरात औसाचे नाव उज्ज्वल करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# नांदेड शहर व ग्रामीण जिल्हा समन्वयक पदी प्रदेश सरचिटणीस ॲड व्यकटराव बेंद्रे यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. खा. श्री. सुनीलजी तटकरे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमार्फत आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या दृष्टीने जिल्हा समन्वयकांची जिल्हावार नियुक्ती करण्यात आली आहे. त्यात नांदेड शहर व ग्रामीण जिल्हा



समन्वयक पदी प्रदेश सरचिटणीस ॲड व्यकटराव भगवानराव बेंद्रे यांची निवड करण्यात आली आहे सदर नियुक्त्यांद्वारे पक्षाच्या संघटनात्मक व नियोजनात्मक विषयांबाबत नवी दिशा व बळकटी प्राप्त होईल, असा दृढ विश्वास सहकार मंत्री ना बाबासाहेब पाटील , माजी मंत्री आ संजय बनसोडे, आ विक्रम काळे, मकरंद सावे, अफसर शेख, प्रा अंकुश नाडे, प्रशांत पाटील आदीनी व्यक्त केला आहे.

# ३० वर्षांनी पानगाव बसस्थानकाचा कायापालट

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यातील मोठी बाजारपेठ आणि २० ते २५ हजार लोकसंख्या असलेले महत्त्वाचे केंद्र असलेल्या पानगाव येथील बसस्थानकाला लवकरच नवा चेहरा मिळणार आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे स्थानक आणि बसस्थानक एकाच ठिकाणी असावे या उद्देशाने १९९५ साली उभारलेल्या या इमारतीची ३० वर्षांपासून झालेली दुरावस्था आता संपुष्टात येणार आहे.या बसस्थानकाच्या दुरुस्तीसाठी आणि आधुनिकीकरणासाठी नुकताच विभागीय स्तरावर सर्वे करण्यात आला आहे. अहिल्यानगर येथील विभागीय नियंत्रक राजेंद्र जगताप आणि श्रीरामपूरचे उपअभियंता संभाजी शिंदे यांनी १३ नोव्हेंबर रोजी पानगाव बसस्थानकाला भेट दिली.हे बसस्थानक 'हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान' अंतर्गत समाविष्ट करण्यासाठी हा सर्व्हे करण्यात आला आहे. लाखो रुपये खर्चून बांधलेल्या या इमारतीमध्ये आजही मूलभूत सुविधांचा अभाव आहे.पाण्याची सोय, तुटलेले नळ, फुटलेल्या खिडक्यांच्या काचा आणि संरक्षक भिंत नसल्यामुळे परिसरात होणारा गैरवापर या समस्यांमुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे.उपअभियंता शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या सर्व्हेचा अहवाल लवकरच वरिष्ठ स्तरावर सादर केला जाईल. सर्व सुविधांनी युक्त सुसज्ज बसस्थानकाची मागणी पानगावकरांकडून होत होती. आता सर्वे पूर्ण झाल्यामुळे, सर्वसामान्यांच्या मागणीनुसार या बसस्थानकाचा कायापालट होऊन, सर्व बसेस या स्थानकातूनच जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.संरक्षण भिंत नसल्यामुळे परिसराचा शौचासाठी वापर हे बसस्थानक उभारून ३० वर्षे होत आली तरी अद्यापही या बसस्थानकाच्या परिसराला संरक्षण भिंत नसल्यामुळे या बसस्थानकाच्या परिसराचा वापर हा शौचासाठी होत आहे.या परिसराला संरक्षण भिंत बांधल्यास या जागेचा चांगला वापर होईल.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियान हे बसस्थानक सर्वसोयी नियूक्त उभारावे आणि या बसस्थानकाची सद्यस्थिती ही जाणून घेऊन हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियान या योजनेसाठी सर्व्हे करण्यात आला. हा केलेला सर्व्हे वरीष्ठ पातळीवर दाखल करण्यात येणार आहे.या योजनेतून या बसस्थानकाचा निश्चीत कायापालट होईल.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ध्वनिक्षेपक वापरावर निर्बंध लागू

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या निवडणुका विना अडथळा व शांततेत पार पडण्यासाठी निवडणुकीच्या काळात ध्वनीक्षेपक (लाउडस्पीकर) वापरावर प्रतिबंध घालण्यात आले आहेत. याबाबतचा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी निर्गमित केला आहे.

कोणत्याही वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून त्याचा वापर फक्त सकाळी ६ वाजलेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत संबंधित पोलीस अधिकारी यांची रीतसर परवानगी घेवून करता येईल. फिरत्या वाहनावर ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही, विशिष्ट ठिकाणी थांबूनच ध्वनीक्षेपकाचा वापर करावा. सर्व राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार किंवा इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे.

# सार्वजनिक इमारतींच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, रहदारीस अडथळा निर्माण न होवू देण्यासाठी निर्बंध

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला असून, कार्यक्रम घोषीत केल्याच्या दिनांकापासून निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. या काळातराजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवरांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणूकीच्यासंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊटस, होर्डींग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण होवू शकतो. तसेच त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे त्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ अन्वये निवडणूकीचे सर्व साहित्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर रहदारीस अडथळा होईल किंवा अपघात होईल, अशा पध्दतीने लावण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे निर्बंध घालण्यात येत असल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

# खाजगी व्यक्तीच्या जागेवर, सार्वजनिक जागेवर झेंडे, भितीपत्रके लावण्यास निर्बंध

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत.

त्यानुसार निवडणूक क्षेत्रात व निवडणुकीवर प्रभाव पडणाऱ्या लगतच्या ग्रामीण क्षेत्रात निवडणूकीच्या प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीगत जागा, इमारत, आवार, भिंत आदी ठिकाणांच्या संबंधित जागा मालकाच्या परवानगीशिवाय व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय प्रचारासाठी वापर करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. हे आदेश दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजीपर्यंत अंमलात राहतील, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## तणावात जगण्यापेक्षा हसत जगा

हल्ली बहुतेक सगळ्यांनाच ताणतणाव असतात. असा माणूस शोधूनही सापडणार नाही ज्याला काहीच तणाव नाही. तणाव मानसिक आणि शारीरिक स्वरूपाचा असतो. कधीकधी क्षुल्लक वाटणारा एखादा प्रसंगही व्यक्तीमध्ये तणाव निर्माण करतो. तणावामुळे माणसाच्या मनावर आणि शरीरावर वाईट परिणाम होऊ शकतो. तणावग्रस्त व्यक्तीच्या जीवनात निरूत्साह, उदासीनता येते त्यामुळे अशी व्यक्ती योग्य निर्णय घेऊ शकत नाही. परीक्षेच्या काळात जवळ जवळ बहुतांश विद्यार्थ्यांना परीक्षेचा ताण येतो, याची वेगवेगळी कारणे असू शकतात. अगदी परीक्षेची तयारी पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही कमी-जास्त प्रमाणात ताण येत-ोच. परीक्षेच्या वेळी तणाव येऊ नये, यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे नीट नियोजन करणे गरजेचे आहे. परीक्षा फक्त शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांपुरतीच मर्यादित नसते. इंटरव्ह्यू असो, स्पर्धा परीक्षा असो, प्रेझेंटेशन असो, अशावेळी सुद्धा थोड्याफार प्रमाणात ताण येतोच. त्यांना आपण आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडू शकू की नाही याची धास्ती वाटते. इतरांच्या आपल्याकडून असलेल्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलो नाही, तर काय होईल याचा ताण त्यांना येतो. काही विद्यार्थी आपली तुलना दुसऱ्यांशी करतात. तो अमुक किती हुशार आहे. आपण त्याच्यापुढे काहीच नाही, असा विचार करून बऱ्याच विद्यार्थ्यांना तणाव येतो. आपल्याला परी-क्षेत आठवेल की नाही, जो अभ्यास केला तोच येईल की नाही असा विचार करून काही विद्यार्थी आपली तब्येत बिघडवून घेतात.

अशावेळी थोडं मनाला शांत करून एक दीर्घ श्वास घ्यावा त्यामुळे आलेला ताण थोडा हलका होण्यास नक्कीच मदत होते. परीक्षेत आपणही इतरांपेक्षा चांगलं करून दाखवू शकतो याची खात्री बाळ-गावी.

जो अभ्यास केला तो जरी नीट लक्षात ठेवला तरी आपल्यातील आत्मविश्वास वाढतो. अर्थात त्यासाठी नियमित अभ्यास गरजेचा आहे.आजचे युग स्पर्धेचे आहे. इथे कुणीही ताणतणावापासून मुक्त नाही. जीवनातील ध्येय प्राप्त करायचे असेल, तर जीवनात थोडा ताण असणेही गरजेचे आहे. त्याशिवाय आपण मेहनत कशी करणार? प्रत्येकाची तणावाची कारणे वेग-वेगळी असतात. आपल्या जीवनात अनेक सुख दुःखे येत असतात. आपण अनेक संकटे झेलून त्यातून बाहेर पडत असतो. जीवन एकदाच मिळतं. मग उगाच तणावात जगण्यापेक्षा हसत हसत का

राजकीय विश्लेषण आणि चर्चासत्रे

## परमेश्वर हाच आपल्या जीवनाचा खरा पाया

जीवन संगीत : सद्गुरू वामनराव पै

परमेश्वर हा विषय समजला नाही, तर हे जग सुखी होणे शक्य नाही, हा जीवनविद्येचा सिद्धांत आहे. इतिहासकाळापासून ते आजपर्यंत, पुरातन काळापासून ते आजतागायत हे जग सुखी झालेले नाही. जग सुखी व्हावे म्हणून लोकांनी अवतार घेतले. देवांचे अवतार झाले. रामावतार, कृष्णावतार असे अनेक अवतार झाले. हे कशासाठी घेतले? जगाला सुखी करण्यासाठीच हे अवतार घेतले. इतके अवतार होऊन सुद्धा काय झाले? जग जसे होते तसेच आहे. जग जिथे होते तिथेच आहे. किंबहुना पूर्वीच्या काळापेक्षा आज परिस्थिती कठीण आहे. त्यात काही फरक पडलेला नाही. अनेक प्रेषित झाले व या प्रेषितांनी निरनिराळे धर्म स्थापन केले व त्या धर्माच्या अनुयायांनी आपआपसांत तंटेबखेडे केले, दंगेधोपे केले, युद्धलढाया केल्या व या धर्मांच्या नावाखाली जितका रक्तपात झाला तो दुसऱ्या कुठल्याही कारणासाठी झाला नसेल. जग सुखी होण्याऐवजी दुःखीच झालेले आहे. किती साधू झाले व



आहेत या साधूंचे काय? त्यांनी काय केले त्यांनी जगाचा विचार केला तरी जग आहे तिथेच आहे. मी नेहमी सांगत असतो की पुरातन काळापासून आजपर्यंत परमेश्वराचा जसा विचार व्हायला पाहिजे होता तसा झालेला नाही म्हणून ही परिस्थिती ओढवलेली आहे. पण आज जेव्हा सत्य सांगायला जातो तेव्हा अनेकांना ते पटत नाही. धर्मामुळे, जातींमुळे, पंथांमुळे, संप्रदायांमुळे मने संकुचित झालेली आहे. बुद्धी संकुचित झालेली आहे. याचा परिणाम म्हणजे भांडणतंटे अधिक झाले. युद्ध लढाया अधिक झाले. जीवनविद्येने याचा पूर्ण विचार केला व यावर तोडगा काढला पाहिजे असे ठरविले. तोडगा काढला नाही, तर हे असेच चालत राहणार. आम्ही जे सांगतो ते लोकांना पटते असे नाही कारण अनेकांचा मेंदू हा चुकीच्या संकल्पनांमध्ये गुंतलेला आहे. द्वैतअद्वैत, विशेष द्वैत विशेष अद्वैत, शुद्ध द्वैत शुद्ध अद्वैत या अनेक गोष्टींमध्ये लोक गुंतलेले होते व अजूनही आहेत. हे मी का सांगतो आहे? कारण या विषयाचा विचार करायचा झाला तर तो नीट समजून घेतला पाहिजे. जीवनविद्या सांगते परमेश्वर ज्याला म्हणतात तो परमेश्वर व आपण समजतो तो परमेश्वर यामध्ये खूप अंतर आहे. लोक आज परमेश्वर म्हटले की मूर्तीकडे जातात. लोकांच्या डोळ्यांसमोर निरनिराळे देव येतात. जे मूर्ती मानत नाहीत त्यांच्या डोळ्यांसमोर काहीच येत नाही. ते काहीतरी कल्पना करतात की कुठेतरी काहीतरी आहे व त्याला ते काहीतरी नाव देतात म्हणजे शेवटी ते कल्पनाच करतात. परमेश्वराबद्दल खरे ज्ञान जोपर्यंत होत नाही तोपर्यंत परिस्थिती चिघळतच जाणार म्हणून जीवनविद्येने यावर तोडगा काढला. जीवनविद्या काय सांगते? परमेश्वर हे आपल्या जीवनाचे मूळ आहे आणि परमेश्वर हाच आपल्या जीवनाचे फळही आहे. याकडे दुर्लक्ष केले तर कुटुंब, जग, विश्व, कधीच सुखी होणार नाही. अगदी कितीही अवतार झाले, किती प्रेषित झाले, कितीही पंथ झाले व कितीही संप्रदाय झाले तरी हे जग असेच चालणार. म्हणून परमेश्वर हाच आपल्या जीवनाचा पाया आहे आणि परमेश्वर हाच आपल्या जीवनाचा कळसही आहे. या सत्याचा स्वीकार करून परमेश्वराबद्दल सद्गुरुंकडून ज्ञान मिळवणे हे अत्यंत महत्त्वाचे.प

## बिबट्यांची दहशत



बिबट्यांच्या दहशतीने महाराष्ट्राचा अक्षरशः थरकाप उडाला आहे. ग्रामीण भागात संध्याकाळनंतर उघड्यावर वावरणं, रस्त्यातून चालत वा दुचाकीवरून जाणं किंवा शेतात काम करणं अशक्य झालं आहे. कालच बिबट्याने चारचाकीवरही हल्ला केला. बिबट्यांचा सर्वत्र सुळस-ुळाट झाला असून त्यांची पावलं आता ग्रामीण भागातून शहरातही पडू ला-गली आहेत. महाराष्ट्रातील ज्या शहरांचा विस्तार झाला आहे, त्या शहरांच्या कडेने जिथे अजूनही शेती केली जाते, अशा ठिकाणी राहणाऱ्यांच्या घरांच्या अंगणात बिबटे सर्रास आपल्या पंजांचे ठसे उमटवू लागले आहेत. कोकणात रानडुकरं, माकडं, तळकोकणात हत्तींनी उच्छाद मांडला आहे. मध्य महाराष्ट्रात मोरांनी शेतकऱ्यांच्या पेरण्याच गट्ट केल्याच्या तक्रारी आहेत. उत्तर, मध्य आणि दक्षिण महाराष्ट्रात बिबट्यांनी धुमाकूळ घा-तला आहे. बिबट्यांचा हा प्रश्न क्वचित मराठवाडा आणि विदर्भातही दिसतो. पण, सह्याद्रीच्या रांगेत त्याने जेवढं विक्राळ रूप धारण केलं आहे, तेवढं तिथे नाही. साधारण दहा वर्षांपासून पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्यांचा मुक्त वावर सुरू झाला. हरिश्चंद्रगडापासून कळसुबाईच्या पायथ्यापर्यंतच्या पट्ट्यात हा वापर सर्वात आधी जाणवू लागला. बिबट्यांनी शिवनेरीच्या पायाशी आ-पला रहिवास केल्यानंतर वन विभागाने जुन्नरला बिबट्यांसाठी तात्पुरती छावणी स्थापन केली. पुणे, अहिल्यानगर जिल्ह्यात पकडलेले बिबटे तिथे बंदिस्त केले गेले. त्यांच्यासाठी तिथे निकषानुसार पिंजरे, खानपान आदींची व्यवस्थाही केली गेली. तिथे 'बिबट सफारी' करण्यापासून अनेक योजना जाहीर केल्या गेल्या. बिबट्यांची व्यवस्था म्हणजे 'वाघ बचाव मोहिमे'चा भाग असल्यासारख्या अनेक रम्य कल्पना मांडल्या गेल्या. मानव आणि वन्यप्राण्यांच्या सहजीवनाबद्दल अनेक लेखही लिहिले गेले. हे लेखही मुख्यतः बिबट्यांची बाजू घेणारेच होते. पण, बिबट्यांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत गेल्याने बिबट्यांच्या बाजूने लिहिणाऱ्यांनी सध्या लेखण्या म्यान केलेल्या दिसतात. शेतकरी, ग्रामीण भागात राहणाऱ्यांचे हाल पाहिल्यानंतर आता कोणीच निसर्ग प्रबोधन करण्याच्या मनःस्थितीत नाही.

बिबट्यांच्या मानवी वस्तीतील वावराला माणूसच जबाबदार आहे, यात वाद नाही. पण, जे आज बिबट्यांचा त्रास सोसता-हेत, ते त्याला जबाबदार नाहीत, हेही लक्षात घेतलं पाहिजे. चूक एकाची आणि शिक्षा भलत्यालाच असा हा प्रकार आहे. बिबट्यांची समस्या जटिल झाली आहे, ती मुख्यतः सह्याद्रीच्या पर्वतरांगांच्या पायथ्याशी. सह्याद्री सुस्थितीत राहिला, तरच महाराष्ट्राचं जीवन सुरक्षित राहील, असं तज्ज्ञ गेली ५० वर्षं सांगताहेत. सुमारे ४० वर्षांपूर्वी त्यासाठी 'पश्चिम घाट बचाव मोहीम'ही आखली गेली होती. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ माधव गाडगीळ यांचा सह्याद्रीच्या जैवविविधतेला संरक्षित करण्यासंबंधीचा अहवालही आपल्या हाती होता. पण, गाडगीळ हे 'पर्यावरण अतिरेकी' असल्याची टीका करून त्यांचा तो अहवाल आपल्याकडून सोयीने बाजूला सारला गेला. सह्याद्रीचं जंगल, वनसंपदा 'विकासकामां'साठी खुली केली गेली. सह्याद्रीच्या निबिड अरण्यात, मोठमोठी यंत्रसामग्री आवाज करू लागली. खोदकामांनी त्यांनी सह्याद्रीची कूस रिकामी केली. तिथलं प्राणी जीवन याने आधी अस्वस्थ आणि मग अस्ताव्यस्त झालं. बिबट्या हिंस्र असल्याने त्याची चर्चा होते. पण, हरणं, मुंगूस, मांजरांसारखे अनेक प्राणी आपला वनातला अधिवास सोडून नाईलाजाने डोंगर सोडून खाली आले. मानवी वस्तीत, गावालगतच्या शेतांत त्यांनी स्वतःसाठी आसरा निवडला. काही वर्षांपूर्वी झालेली माळीण किंवा इर्शाळवाडीची दुर्घटना अशाच कारणांनी झाल्या होत्या. वाढती लोकसंख्या, शहरी जीवनापासून दूर जाऊन जंगलात 'फार्म हाऊस' करण्याची हौस, रिसॉर्ट, वॉटर पार्क यांसारख्या वेगवेगळ्या कारणाने महाराष्ट्रात मुळात वनजमिनींचं अधिग्रहण वाढलं आहे. सरकारी विभाग आपल्या विकासकामांसाठी वन जमिनीची मागणी करतात. ते त्या बदल्यात झाडं लावण्याचं कागदोपत्री मान्यही करतात. पण, प्रत्यक्षात अशी यशस्वी वृक्ष लागवड कुठेच होत नाही. नवे रस्ते बांधताना किंवा अस्तित्वात असलेल्या रस्त्यांच्या रुंदीकरणात झाडांची जेवढी कत्तल होते, त्यांचं ना पुनर्रोपण होत, ना कोणी नवी झाडं लावतं!

महाराष्ट्राच्या वनसंपत्तीचं झालेलं उद्ध्वस्तीकरण आपल्याला बिबट्यांच्या मानवी वस्तीतील वावरातून दिसतं आहे. दुर्दैवाने हे ना कोणी सांगतं आहे, ना कोणी कबूल करतं आहे. बिबट्यांच्या बंदोबस्तासाठी अनेक उपाय आहेत. त्यातल्या कोणत्या ना कोणत्या उपायांनी मानवी वस्तीतले बिबटे नष्ट करता येतील! पण त्यामागे जी वन्य जीवसाखळी आहे; ती उद्ध्वस्त होते आहे, त्याचं काय? हा निसर्गवादी दृष्टिकोन नाही. माणसाच्या जगण्याचं इंगितच या निसर्गात आहे. सिमेंटीकरणाच्या हव्यासापोटी, किरकोळ हितसंबंधांसाठी आपण हजारो वर्षांची जीव साखळी उद्ध्वस्त करतो आहोत, म्हणजे दूरवर माणसाचा श्वासच तोडतो आहोत, ही जाणीवच कुठे दिसत नाही. डोंगरदऱ्यातून बाहेर पडलेल्या बिबट्यांना पुणे - अहिल्यानगर - नाशिक पट्ट्यातील उसाच्या शेतांत आसरा घेणं सोपं होतं. बिबट्यांची बाळंतपणंही या उसात झाली आणि त्यामुळे त्यांची संख्याही भरमसाट वाढली. 'एआय'चा वापर करून मांजराला घाबरून बिबट्या पळाला किंवा माणसाने शौर्याने त्याचा मुकाबला केल्याच्या नकली 'रील' तयार करणं सोपं आहे. एखाद् दुसऱ्या ठिकाणी असं घडलंही असेल. पण, अपवाद म्हणजे नियम नाही. महाराष्ट्राचा ग्रामीण भाग सध्या केवळ भयभीतच नाही, मुलाबाळांच्या काळजीने अस्वस्थ आहे. सरकारने याची गंभीर दखल घेऊन तातडीची उपाययोजना म्हणून बिबट्यांच्या नसबंदीची धडक मोहीम राबवण्याचे आदेश वनविभागाला दिले पाहिजेत. दुसऱ्या बाजूला वनसंपदेचा गंभीर विचार करून त्यासंबंधीचं स्वतंत्र नवं धोरण जाहीर केलं पाहिजे. महाराष्ट्राच्या समृद्धीची वाट वनसंपदेच्या समृद्धतेतूनच आहे, याची जाणीव त्या धोरणात दिसली पाहिजे. त्यातून संरक्षणही होईल आणि अनेक समस्याही सुटतील.

## पौष्टिक खा, फिट राहा! डॉक्टर टीप्स



### हेल्थ टिप्स

दिवसातून फक्त दोनवेळा जेवण घेतलं पाहिजे आणि कमी जेवण्यापेक्षा कमी वेळा जेवणं गरजेचं आहे असंही डॉ. दीक्षित म्हणाले. दोनवेळा जेवतानाही ते जास्तीत जास्त ५५ मिनिटांमध्ये संपवणं गरजेचं आहे. हा डाएटप्लॅन फॉलो केल्यास वजन कमी होईल, पोटाचा घेर कमी होईल, रक्तातील तीन महिन्यातील कळणारं साखरेचं प्रमाण कमी होईल आणि फास्टिंग शुगरही कमी होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. एकदा जेवतो तो योगी, दोनवेळा जेवतो तो भोगी आणि तीनवेळा जेवतो तो रोगी अशी संतांची शिकवण आहे,याचाही दाखला त्यांनी दिला. आहारात हे बदल केल्यामुळे वजन कमी होईल, पोटाचा घेर कमी होईल असा विश्वास त्यांनी कट्ट्यावर व्यक्त केला.

(क्रमशः)

## विनोद




विमानात बसलेला एक अमेरिकन माणूस भारतीय माणसाला म्हणतो, ङ्गतुमच्या कोटाचे वरचे बटण तुटले आहे. जरा लावून घ्या.फ त्यावर भारतीय माणूस म्हणतो, ङ्गतुम्ही लोक दुसऱ्याच्या गोष्टीत फार लक्ष घालता, तुमच्या हातातल्या चिरुटमुळे तुमचा कोट जळतोय, तरी मी काही बोललो का?फ

## संदेश

santa ka beta: Sirji, jab aap paath padaate ho, to mujhe mere pitaa ki yaad aati hai.
Sirji: achchi baath hai. kis-liye unki yaad aati hai?
santa ka beta: unko bhi aap hi ke jaise padaana nahi aata hai.

## सुविचार




व्यक्तीया छायेप्रमाणे विरून जातात, पण राष्ट्र मात्र ास्थिर आणि शाश्वत टिकून राहते.
– ई. बुर्क

### संस्कृत सुभाषित

अन्योन्यसमुपष्टम्भादन्योन्यापाश्रयेण च
ज्ञातय: संप्रतवर्धन्ते सरसीवोत्पलान्युत ।।
(उद्योगपर्व, अध्याय ३६, श्लोक ३६, महाभारत)

**अर्थ** – तळ्यात वाढणाऱ्या कमळाप्रमाणे, परस्परांस सहाय्य करून व परस्परांचा आश्रय घेऊन समुदायाचा उत्कर्ष होत असतो

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालह-वाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### बुमराहचा पंच, कुलदीपची जादू! कोलकाताच्या ईडन गार्डनवर डब्ल्युटीसी चॅम्पियन्सचे वस्त्रहरण

दिल्ली–भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिल्या कसोटी मॅचच्या पहिल्या इनिंगमध्ये दक्षिण आफ्रिकेची बॅटिंग पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. ईडन गार्डन्सवर कॅप्टन बावुमा याने टॉस जिंकून प्रथम बॅटिंगचा निर्णय घेतला होता, पण टीम इंडियाच्या फास्ट बॉलर्स आणि स्पिनर्सच्या भेदक माऱ्यासमोर त्यांचा डाव फक्त ५५ ओव्हरमध्ये १५९ धावांवर संपुष्टात आला. इनिंग्ज ब्रेक जाहीर करण्यात आला असून, टीम इंडिया आता बॅटिंगसाठी मैदानात उतरणार आहे.

दक्षिण आफ्रिकेची सुरूवात संथ झाली. एडन मार्करम याने सर्वाधिक ३१ धावा केल्या. याशिवाय रायन रिकलटन २३, विआन मल्डर २४ आणि टोनी डी झोर्झी २४ धावा काढून परतले. या चार बॅटर्सव्यतिरिक्त एकालाही २० धावांचा आकडा पार करता आला नाही. कॅप्टन टेम्बा बावुमा फक्त ३ धावांवर आऊट झाला. ट्रिस्टन स्टब्स याने १५ धावा काढून एक बाजू सांभाळण्याचा प्रयत्न केला, पण त्याला दुसऱ्या बाजूने साथ मिळाली नाही. सलामीवीरांची विकेट गेल्यानंतरच साऊथ अफ्रिकेचा डाव ढेपाळण्यास सुरूवात झाली.

जसप्रीत बुमराहने आपल्या भेदक स्विंग आणि अचूक बॉलिंगने दक्षिण आफ्रिकेच्या ५ बॅटर्सला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

***

### पलटनमध्ये येताच शार्दुलच्या नावे मोठा विक्रम!

मुंबई–आयपीएल २०२५ स्पर्धेच्या लिलाव–ापूर्वी खेळाडूंच्या ट्रेडची जोरदार चर्चा रंगली आहे. सर्व संघांना १५ नोव्हेंबरपर्यंत आपल्या रिटेन आणि रिलीज केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करावी लागणार आहे. त्याआधी ट्रेड डीलबाबत अनेक बातम्या समोर आल्या आहेत. संजू सॅमसन चेन्नई सुपर किंग्ज संघात जाणार आणि रवींद्र जडेजा राजस्थान रॉयल्समध्ये येणार असल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. दरम्यान ही चर्चा सुरू असताना ५ वेळचा चॅम्पियन संघ मुंबई इंडियन्सने शार्दुल ठाकूरला आपल्या ताफ्यात स्थान दिलं आहे.

शार्दुल ठाकूर गेल्या हंगामात लखनौ सुपर जायंट्स संघाकडून खेळताना दिसून आला होता.आगामी हंगामापूर्वी मुंबई इंडियन्सने शार्दुलला २ कोटी रोख रक्कम मोजून आपल्या संघात स्थान दिलं आहे.मुंबई आणि लखनौने कुठल्याही खेळाडूंची अदलाबदल न करता रोख रक्कम देऊन शार्दुलला आपल्या संघात स्थान दिलं. यादरम्यान शार्दुल ठाकूरच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे.

आयपीएल २०१७ स्पर्धेआधी रायझिंग पुणे सुपरजायंट्स

***

### जसप्रीत बुमराह टेम्बा बवुमाला नको नको ते बोलून गेला

कोलकाता–जसप्रीत बुमराहने नकळत एक चूक केली, ज्यासाठी त्याला आयसीसीकडून फटकारले जाऊ शकते किंवा दंडही भरावा लागू शकतो. कोलकात्यातील ईडन गार्डन्सवर खेळल्या जाणाऱ्या भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी, जसप्रीत बुमराहने दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाला असे काहीतरी म्हटले, ज्यामुळे त्याची अडचण वाढू शकते. जसप्रीत बुमराहने जाणूनबुजून किंवा नकळत टेम्बा बावुमाला बटू म्हटले, जे बॉडी शेमिंगमध्ये येते.भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना कोलकात्यातील ऐतिहासिक ईडन गार्डन्स मैदानावर खेळवला जात आहे. नाणेफेक आफ्रिकन कर्णधार टेम्बा बावुमाने जिंकली.टेम्बा बावुमाने नाणेफेक जिंकत पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, त्यानुसार भारतीय संघाला पहिल्यांदा गोलंदाजीसाठी मैदानात उतरावे लागले. दरम्यान, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या दिवसाच्या पहिल्या सत्रात जसप्रीत बुमराहकडून एक मोठी चूक झाली. टेम्बा बावुमाच्या उंचीवर केलेली त्याची टिप्पणी स्टंप माईकमध्ये कैद झाली आणि त्याचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## वैभव सूर्यवंशीचं रौद्र रूप!

**१४४ धावांची शानदार खेळी**

**४२ चेंडूत ११ चौकार व १६ षटकार ▶ अवघ्या ३२ चेंडूत झळकावलं वादळी शतक**



**नवी दिल्ली:** रायझिंग स्टार आशिया कप २०२५ स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत भारतीय संघ जितेश शर्माच्या नेतृत्वाखाली खेळत आहे. भारतीय संघ युएईविरुद्ध सामन्याने मोहिमेची सुरुवात केली आहे. पहिल्याच सामन्यात सलामीवीर वैभव सूर्यवंशीने शतकी खेळी करत गोलंदाजांचा धुव्वा उडवला.

दोहामधील वेस्ट एन्ड पार्क इंटरनॅशनल स्टेडियममध्ये हा सामना खेळवला जात आहे. भारत अ संघाने सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. जो संघासाठी अगदी योग्य ठरला आणि भारताने २९७ धावांचा डोंगर उभारला. सूर्यवंशीच्या शतकासह भारताच्या इतर फलंदाजांनीही महत्त्व–पूर्ण योगदान दिलं आहे.वैभव प्रियांश आर्यसह सलामीला उतरले. प्रियांश १० धावा करत धावबाद झाला. पण यानंतर वैभव सूर्यवंशीने गोलंदाजांची शाळा घ्यायला सुरुवात केली. त्याने सुरुव–ातीला अवघ्या १७ चेंडूत अर्धशतक झळकावलं. इतक्यावर तो थांबला नाही, यानंतर त्याने चौकार षटकारांचा पाऊस पाडत अवघ्या ३२ चेंडूत शकत पूर्ण करत वादळी खेळी साकारली.शतकानंतरही वैभव सूर्यवंशीची बॅट थांबली नाही, त्याने एका षटकात ३० धावा चोपत झपाट्याने संघाच्या धावसंख्येत भर घा–तली. वैभव झेलबाद होण्यापूर्वी त्याने ४२ चेंडूत ११चौकार व १६ षटकरांच्या मदतीने १४४ धावांची शानदार खेळी केली.

वैभव सूर्यवंशी नमन धीरची विक्रमी भागीदारी

वैभव सूर्यवंशी व नमन धीर यांनी १५० अधिक धावांची भागीदारी रचली. नमन धीरने २३ चेंडूत ३ चौकार व २ षटकारांसह ३४ धावांची खेळी केली. याशिवाय कर्णधार जितेश शर्मांने या सामन्यात ३२ चेंडूत ८ चौकार व ६ षटकार लगावत ८३ धावांची झटपट खेळी केली. वैभव व जितेशच्या वादळी खेळीसह भारताने २० षटकांत ४ बाद २९७ धावा केल्या आहेत.

१४ वर्षीय वैभव सूर्यवंशी उत्कृष्ट फॉर्मात असून त्याने गेल्या काही काळात उत्कृष्ट खेळी केल्या आहेत. आयपीएलमध्ये शतक केल्यानंतर त्याने युथ वनडे आणि युथ टेस्टमध्येही शतकी खेळी केली. यानंतर आता त्याने भारतीय अ संघाकडून खेळताना शतक झळकावत शतकांचा

**वैभव सूर्यवंशी व नमन धीर यांनी १५० अधिक धावांची भागीदारी**

**भारताने २९७ धावांचा डोंगर उभारला**

**कर्णधार जितेश शर्मांने ८३ धावांची झटपट खेळी**

**अवघ्या १७ चेंडूत अर्धशतक झळकावलं**

## बांगलादेशचा आयरिश संघावर मोठा विजय



सिल्हेट–बांगलादेशनं आयर्लंडविरुद्धची पहिली कसोटी एक डाव आणि ४७ धावांनी जिंकली. सिल्हेटमधील या विजयासह, बांगलादेशनं दोन सामन्यांच्या मालिकेत १–० अशी आघाडी घेतली. यजमानांच्या विजयाचा नायक महमूदुल हसन जॉय होता, त्यानं बांगलादेशच्या पहिल्या डावात सलामीवीर म्हणून १७१ धावा केल्या. या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आलं.

आयर्लंडच्या पहिल्या डावात २८६ धावा : सामन्यात नाणेफेक जिंकून फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, आयर्लंडचा पहिला डाव फक्त २८६ धावांवर संपला. संघाची सुरुवात खराब झाली. कर्णधार अँड्र्यू बालबर्नी एकही धाव न घेता बाद झाला. तेथून, पॉल स्टर्लिंगनं केड कार्मायकलसह डाव सावरला आणि दुसऱ्या विकेटसाठी ९६ धावा जोडल्या. स्टर्लिंग ६० धावांवर बाद झाला, तर कार्मायकलनं ५९ धावा केल्या. कर्टिस कॅम्फरनं ४४ धावांचं योगदान दिलं, तर लॉरेन टकरनं ४१ धावांचं योगदान दिलं. विरोधी संघाकडून मेहदी हसन मिराजनं सर्वाधिक ३ बळी घेतलं, तर हसन महमूद, तैजुल इस्लाम आणि हसन मुराद यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

बांगलादेशचा ८ बाद ५८७ धावांवर पहिला डाव घोषित : प्रत्युत्तरादाखल बांगलादेशनं ८ बाद ५८७ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला. महमूदुल हसन जॉयनं शादमान इस्लामसह पहिल्या विकेटसाठी १६८ धावा जोडल्या. इस्लामनं संघाच्या धावसंख्येत ८० धावांचं योगदान दिलं. त्यानंतर महमूदुलनं मोमिनुल हकसह दुसऱ्या विकेटसाठी १७३ धावा जोडल्या आणि संघाला ३०० धावांचा टप्पा ओलांडून दिला. महमूदुल २८६ चेंडूत १७१ धावांवर बाद झाला, ज्यामध्ये ४ षटकार आणि १४ चौकारांचा समावेश होता. कर्णधार नझमुल हुसेन शांतोनं १०० धावा केल्या, तर मोमिनुल हकनं ८२ धावांचं योगदान दिलं. आयर्लंडकडून मॅथ्यू हम्फ्रीजनं पाच बळी घेतले, तर बॅरी मॅकार्थीनं दोन बळी घेतले.

बांगलादेशकची ३०१ धावांची आघाडी, आयर्लंड २५४ धावांवरच बाद : पहिल्या डावात बांगलादेशकडे ३०१ धावांची आघाडी होती. दुसऱ्या डावात आयर्लंडनं पुन्हा एकदा चाहत्यांना निराश केलं आणि त्यांची धावसंख्या फक्त २५४ धावांवरच संपली. अँडी मॅकब्राइननं सर्वाधिक ५२ धावा केल्या, तर पॉल स्टर्लिंगनं ४३ आणि कर्णधार बाल्बर्नीनं ३८ धावा केल्या, परंतु ते आयर्लंडला डावाच्या पराभवापासून वा–चवू शकले नाहीत. दोन्ही देशांमधील दुसरा कसोटी सामना १९ नोव्हेंबर रोजी ढाका इथे खेळला जाईल, ज्यामध्ये बांगलादेश क्लीन स्वीप करण्याचा प्रयत्न करेल.



## ओडीआय चालू सामन्यान पाकिस्तानवर ठोठावला मोठा दंड

दुबई –पाकिस्तान क्रिकेट संघ सध्या अडचणीत आहे. श्रीलंकेचा संघ पाकिस्तान दौऱ्यावर आहे, जिथं तीन सामन्यांची वनडे मालिका सुरु आहे. पाकिस्तानी संघानं पहिला सामना शेवटच्या षटकात जिंकला, परंतु आता आयसीसीनं पाकिस्तानविरुद्ध संघाविरुद्ध कडक कारवाई केली आहे. मालिकेत आणखी दोन सामने शिल्लक आहेत, ज्याचं वेळापत्रक देखील बदलण्यात आलं आहे.

पाकिस्ताननं जिंकला पहिला सामना : वनडे मालिकेचा पहिला सामना पाकिस्तानच्या रावळपिंडी इथं खेळला गेला. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पाकिस्ताननं २९९ धावांचा मोठा आकडा गाठला. पाकिस्तानी संघ हा सामना आरामात जिंकेल अशी अपेक्षा होती, परंतु तसं झालं नाही. सलमान अली आघा यानं सामन्यात शतक झळकावलं. पाकिस्ताननं शेवटच्या षटकात ६ धावांनी धडपडत विजय मिळवला, परंतु सामना उशिरा संपला. गोलंदाजी करताना पाकिस्तानी संघानं बराच वेळ घेतला आणि आता त्याचे परिणाम संघाला भोगावे लागत आहेत.स्लो ओव्हर रेटसाठी आयसीसीनं ठोठावला पाकिस्तानला दंड : आयसीसीनं स्लो ओव्हर रेटसाठी पाकिस्तानला दंड ठोठावला आहे. आयसीसीनं संघावर २० टक्के दंड ठोठावल्याचं वृत्त आहे. शाहीन शाह आफ्रिदी सध्या पाकिस्तानी संघाचं नेतृत्व करत आहे. आयसीसीनं सांगितलं आहे की संघानं निर्धारित वेळेपेक्षा चार षटकं कमी टाकली. आयसीसीच्या मॅच रेफरी पॅनेलचे अली नक्वी यांनी हा दंड ठोठावला. आयसीसीनं पाकिस्तानी संघाला आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.२२ अंतर्गत दोषी ठरवलं आहे, ज्यामध्ये निर्धारित वेळेत न टाकलेल्या प्रत्येक षटकासाठी त्यांच्या मॅच फीच्या पाच टक्के दंडाची तरतूद आहे. या कायद्यानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. पाकिस्तानचा कर्णधार शाहीन आफ्रिदीनं दंड स्वीकारला आहे, त्यामुळं औपचारिक सुनावणीची आवश्यकता राहणार नाही.

वनडे मालिकेचे वेळापत्रक देखील बदललं : मालिकेचा दुसरा सामना १३ नोव्हेंबर रोजी होणार होता, परंतु इस्लामाबादमध्ये बॉम्बस्फोट झाला त्यातच रावळपिंडी इस्लामाबादच्या जवळ असल्याने १३ नोव्हेंबर रोजी होणारा सामना पुढे ढकलण्यात आला आहे आणि आता तो आज १४ नोव्हेंबर रोजी खेळवला जाईल. सामन्याचे ठिकाण बदललेले नसले तरी, श्रीलंकेच्या खेळाडूंना अजूनही बॉम्बस्फोटांची भीती आहे. श्रीलंकेच्या काही खेळाडूंनी मालिका अर्ध्यावर सोडून मायदेशी परतण्याची इच्छा व्यक्त केली होती, परंतु श्रीलंका क्रिकेट बोर्डानं नकार दिला आहे. याचा अर्थ सर्व खेळाडू सध्या

## लक्ष्य सेन जपान मास्टर्सच्या उपांत्य फेरीत



कुमामोतो–भारताचा अव्वल बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने शुक्रवारी माजी विश्वविजेता सिंगापूरच्या लोह कीन यूवर निराशाजनक विजय मिळवत ४,७५,००० अमेरिकन डॉलर्सच्या कुमामोटो मास्टर्स जपानच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सातव्या मानांकित विजेत्या सेनने ४० मिनिटांत जागतिक क्रमवारीत ९ व्या मानांकित लोहवर २१–१३, २१–१७ असा विजय मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली आणि १३ कारकिर्दीतील सातव्या विजयासह सिंगापूरच्या खेळाडूवर आपले वर्चस्व वाढवले. सप्टेंबरमध्ये हाँगकाँग ओपनमध्ये उपविजेता राहिलेला जागतिक क्रमवारीत १५ व्या मानांकित खेळाडू पुढील सामना जपानचा सहावा मानांकित आणि जागतिक क्रमवारीत १३ व्या मानांकित केंटा निशिमोतोशी करेल.

पहिल्या गेममध्ये दोघांमध्ये ४–४ अशी बरोबरी झाली होती, परंतु मध्यांतरात सेनने ११–८ अशी आघाडी घेतली. ब्रेकनंतर त्याने सलग सहा गुण मिळवत १८–९ अशी आघाडी घेतली आणि आरामात गेम संपवला. दुसऱ्या गेममध्ये लोहने चांगला प्रतिकार दाखवला आणि सेनसोबत ९–९ अशी बरोबरी केली, परंतु भारतीय खेळाडूने पुन्हा एकदा १५–९ अशी आघाडी घेतली. सिंगापूरच्या खेळाडूने हे अंतर १७–१८ पर्यंत कमी केले, परंतु सेनने सामना जिंकण्यासाठी दृढनिश्चय केला.

## दक्षिण आफ्रिका सर्वबाद १५६, भारत एक बाद ३७

कोलकाता–भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेला शुक्रवारपासून सुरूवात झाली आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवसाचा खेळ लवकर संपवण्यात आला आहे. खराब सूर्यप्रकाशामुळे पंचांनी काही वेळ सामना सुरू ठेवला, पण हिवाळा असल्याने लवकर अंधार पडतो. त्याचप्रमाणे अंधार पडू लागल्याने खेळ लवकर बंद करण्यात आला.

जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीपुढे आफ्रिकेच्या खेळाडूंनी सपशेल शरणागती पत्करली. बुमराहच्या या नेत्रदिपक गोलंदाजीमुळे भारताने दक्षिण आफ्रिकेचा डाव १५६ धावांमध्ये गुंडाळला. बुमराहला अन्य गोलंदाजांनी चांगली साथ दिली. बुमराने त्याच्या कसोटी कारकिर्दीत १६ व्यांदा एका डावात पाच बळी घेतले. मोहम्मद सिराज आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. अक्षर पटेलने एक विकेट घेतली, तर सलामीवीर एडेन मार्करामने सर्वाधिक ३१ धावा केल्या. भारताने दक्षिण आफ्रिकेला १५६ धावांवर सर्वबाद केल्यानंतर फलंदाजी करताना २० षटकांत १ बाद ३७ धावा केल्या आहेत. यशस्वी जैस्वाल बाद झाल्यानंतर केएल राहुल व वॉशिंग्टन सुंदरने संघाचा डाव सावरला. ईडन गार्डन्स स्टेडियमवर कर्णधार टेम्बा बावुमाने नाणेफेक जिंकली आणि फलंदाजीचा निर्णय घेतला, परंतु संघाने पहिल्या तासातच आपले सलामीवीर गमावले. टी ब्रेकपर्यंत आठ फलंदाज पॅव्हेलियनमध्ये परतले होते. शेवटच्या सत्राच्या तिसऱ्या षटकात जसप्रीत बुमराहने सायमन हार्मर आणि केशव महाराज यांना बाद केले, ज्यामुळे दक्षिण आफ्रिकेला १५९ धावांवर बाद केले. पहिल्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताने १ बाद ३७ धावा केल्या होत्या. केएल राहुल १३ आणि वॉशिंग्टन सुंदर ६ धावांवर नाबाद राहिले. सलामीवीर यशस्वी जैस्वाल १२



धावांवर बाद झाला, त्याला मार्को यान्सनने बोल्ड केले.

जसप्रीत बुमराहचा विक्रम

या डावात ५ गडी बाद करताच बुमराहच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. बुमराहने कसोटी क्रिकेटमध्ये १६ वेळेस एकाच डावात ५ गडी बाद करण्याचा पराक्रम केला आहे. यासह त्याने भारताचे माजी गोलंदाज भागवत चंद्रशेखर यांच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. भारतीय संघासाठी खेळताना आर अश्विनने ३७ वेळा, अनिल कुंबेळेंनी ३५ वेळा, हरभजन सिंगने २५ वेळा, कपिल देव यांनी २३ वेळा ५ गडी बाद करण्याचा पराक्रम केला आहे. यासह बुमराहच्या नावे आणखी एका मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. २०१९ मध्ये बांगलादेशविरूद्ध झालेल्या डे–नाईट कसोटी सामन्यात गोलंदाजी करताना ईशांत शर्माने गोलंदाजी करताना पहिल्याच दिवशी ५ गडी बाद करण्याचा पराक्रम केला होता. त्याआधी कसोटी क्रिकेटमध्ये गोलंदाजी करताना डेल स्टेनने २००८ मध्ये खेळताना हा विक्रम आपल्या नावे केला होता. दरम्यान ६ वर्षानंतर भारतात गोलंदाजी करताना, पहिल्याच दिवशी ५ गडी बाद करणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत तो अव्वल स्थानी पोहोचला आहे.

कुलदीपची संघातून रिलीज करण्याची मागणी

कुलदीप यादवने बीसीसीआयकडे सुट्टी मिळावी अशी विनंती केली आहे. या महिन्याच्या अखेरीस कुलदीप यादव लग्न करणार असून याकरता त्याने सुट्टीसाठी अर्ज केला आहे. भारत आणि पाकिस्तानमधील तणावामुळे इंडियन प्रीमियर लीग नियोजित तारखेपेक्षा उशिरा संपल्यामुळे त्याचं लग्न पुढे ढकलावं लागलं होतं. कुलदीपने नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यासाठी सुट्टीची विनंती केली आहे. भारत २२ नोव्हेंबरपासून गुवाहाटीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दुसरा कसोटी सामना खेळणार आहे, तर दोन्ही संघांमधील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला ३० नोव्हेंबरला रांचीमधून सुरूवात होणार आहे. कुलदीपच्या सुट्टीवर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

# विश्वधर्मी रामेश्वर (रुई) येथे 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना'चे लोकार्पण

# विश्वनाथाच्या रुपाने 'मानवतेची ज्योत' प्रज्वलीत

## भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांचे सुपूत्र सुनील शास्त्री यांचे विचार





**लातूर/प्रतिनिधी :** जगाला एका सूत्रात ठेवायचे असेल तर मानवता आवश्यक आहे. मानवते शिवाय कोणताही देश जीवंत राहू शकत नाही. देशाच्या उन्नतीसाठी मानवता आणि व्यक्तीचे शुद्ध आचरण अत्यंत महत्वाचे आहे. आज रामेश्वर (रूई) येथे विश्वनाथाच्या रुपाने मानवतेची ज्योत पेटविण्यात आली आहे. जी संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी आहे.'' असे विचार भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांचे सुपूत्र व माजी खासदार सुनील शास्त्री यांनी व्यक्त केले.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर (रूई) यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनाचे' लोकर्पण लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रूई) या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

सत्य, शांती, अहिंसा, प्रेम आणि मानवतेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या, मानवी इतिहासातील काही उत्तुंग व पथदर्शी व्यक्तिमत्वांच्या चैतन्यदायी प्रतिकांची या ठिकाणी प्रतिष्ठापना, पूजन आणि कोनशिलेचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मानवतेची ज्योत प्रज्वलत ठेवणारे डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचा विशेष सत्कार जपान येथून आलेले इसो कोईतोमियो व पेजावर मठाच्या वतीने करण्यात आला.

यावेळी अखील भारतीय मराठी साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस व रामविलास वेदांती हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी संत वृत्तीचे शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर होते. तसेच या वास्तूचे संकल्पक, संरचना, नियोजक व निर्मितीकार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे उपस्थित होते. तसेच आमदार रमेश कराड, माईर्स एमआयटीचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राहुल वि. कराड, अध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड, माईर्स एमआयटीचे विश्वस्त हभप तुळशीराम दा. कराड, प्रगतिशील शेतकरी हभप काशीराम दा. कराड, रामेश्वर (रूई) चे सरपंच सचिन कराड व राजेश कराड उपस्थित होते.

सुनील शास्त्री म्हणाले,'' भारतरत्न लाल बहाद्दू शास्त्री यांनी दिलेल्या जय जवान, जय किसन या संदेशाच्या पुढे वर्तमानकाळात जय इंसान जोडणे गरजेचे आहे. लाल बहाद्दूर शास्त्री यांनी मानवतेचे स्वप्न मला दाखविले होते परंतू प्रत्यक्षात डॉ. कराड यांनी ते साकार केले आहे.''

डॉ.विजय भटकर म्हणाले,'' मानवतेचा संदेश मांडणारे डॉ. विश्वनाथ कराड हे विश्वासमोर एक आदर्श आहेत. यातूनच समाजात एक उच्च संस्कृती उदयास येईल. या विचारातूनच एक आदर्श समाज निर्माण होईल. तसेच समरसतेचा संदेश खेड्या खेड्यातून जगापुढे जाणे गरजेचे आहे.''

प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,'' संपूर्ण जगाला विश्वशांती आणि विश्व कल्याणाचा संदेश विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनातून जाईल. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत देशाचे खरे रुप रामेश्वर येथे दिसून येते आहे. हा मानवता भवनच संपूर्ण जगाची दिशा दर्शविणारा आहे. येथून भारतीय चिंतन, परंपरेचा संदेश विश्वात पोहचणार असून सर्वांनी त्याचे अनुकरण करावे. भगवान गौतम बुद्धांचे पंचशील आणि संत ज्ञानेश्वर माऊली यांचे पसायदान हे मानव उध्दारासाठी आहे.''

डॉ. राहुल दा. कराड म्हणाले,'' संस्थेच्या माध्यमातून डॉ. कराड यांनी माइलस्टोन कार्य केले आहे. विश्व शांती हेच या संस्थेचे लक्ष्य असून त्या आधारेच मानवतातीर्थ भवनाची निर्मिती झाली. या भवनातूनच संपूर्ण जगात लोकशाही बळकट करणे, अध्यात्म आणि खिलाडूवृत्ती रूजविण या तीन गोष्टीं साकार होतील.''

डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले,'' विश्वात सुरू झालेल्या संघर्षाच्या वातावरणात मानव भयभीत झाला आहे. अशा वेळेस मानवधर्मा संदर्भात विचार करतांना एकात्मता, विज्ञान आणि अध्यात्माचा सारांश, संतांचे संतत्व आणि धर्माची पुण्याई या सर्वांचा मेळ म्हणजेच मानवता येथे दिसून येते आहे. सर्व धर्मांचा गाभा हा मानवतेचा आहे. येथूनच सात्विकतेचा आणि अहिंसेचा विचार विश्वाला तारणारा आहे. या वास्तूत मानवधर्माचे तीर्थ क्षेत्र दिसून येत आहे. येथे धार्मिकतेची देवाण घेवाण घडतांना दिसत आहे.''

डॉ. राम विलास वेदांती म्हणाले,'' विश्वाला शांती आणि मानवतेचे रक्षण करण्यासाठी डॉ कराड यांचे मानवतेचे विचार महत्वाचे आहे. सामाजिक सदभावसाठी राष्ट्रीय एकतेचे सर्वात मोठे कार्य केले आहे. डॉ. कराड यांनी बनविलेले विश्वधर्मी मानवता भवनात सर्व जाती, धर्मांचे लोक विराजमान आहेत. रामेश्वर येथे सामाजिक एकतेचे दृष्य पहावयास मिळणे हे दुर्लभ क्षण आहेत.''

यावेळी फादर फेलिक्स मचाडो, राहुल भन्ते बोधी, एडीसन सामराज, डॉ. मेहर मास्टर मूस, इझिकेल मळेकर, सरदार सुरजीत सिंह खालसा, डॉ. फिरोज बख्त अहमद, डॉ. लेसन आझादी, योगी अमरनाथ, मौलाना अन्सारी चतुर्वेदी, महंत रामदास, बि.के. बिन्नी सरीन, कमलाताई गवई, पुष्पा बोंडे, मायकेल गनेल, इंद्रजीत भालेराव या सर्वांनी डॉ. कराड यांच्या विश्वशांती कार्याला हातभार लावण्याचे आश्वासन दिले. तसेच त्यांच्या कार्याला पाहुन भारत सरकार कडून भारतरत्न देण्याची मागणी केली. ते सर्व गुण संपन्न आहेत. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे उत्तुंग कार्य पाहता त्यांना नोबल पुरस्काराने गौरवान्वित करण्यात यावे. तसेच माजी केंद्रीय मंत्री डॉ. करण सिंग, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर आणि अमेरिकेतून डॉ. अशोक जोशी यांनी व्हिडीओच्या माध्यमातून संदेश दिला.

यावेळी लेखक लक्ष्मण घुगे लिखित विश्वशांतीची महागाथा या कादंबरीचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते झाले. तसेच वास्तू रचनाकार विभीषण शेप यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. मिलिंद पात्रे यांनी ओमकार ध्यान साधना केली. डॉ. मंगेश तु. कराड यांनी स्वागतपर भाषण केले. डॉ. गौतम बापट व प्रा.अतुल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुचित्रा कराड-नागरे यांनी आभार मानले.

## भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी



बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती सांस्कृतिक विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवनेरी महाविद्यालय, शिरूर आनंतपाळ येथील डॉ. सतीश कुंडलावर यांची उपस्थिती होती.

प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून या जयंती कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग मुंढे यांनी केले तर कार्यक्रमाला डॉ.अभिजीत बादाडे, डॉ.नरेंद्र देशमुख, प्रा. शिल्पा

हालशीकर, प्रा.नंदा खरटमल, डॉ. महावीर कटके, डॉ.कांतराव पोले, डॉ. सुरेशकुमार कांबळे, प्रा. विवेक गोस्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी शिक्षकेत्तर कर्मचारी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विभागीय आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश



**लातूर/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,नांदेड आयोजित दि.१० ते ११ नोव्हेंबर २०२५ या दरम्यान झालेल्या विभागीय मैदानी स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याने घवघवीत यश संपादन केले आहे.यामध्ये अकरावीचा जेईईचा विद्यार्थी ऋषी बजाज याने जिम्नॅस्टिक आर्टिस्टिक प्रकारात प्रथम क्रमांक मिळून दि.१८ ते २१ नोव्हेंबर २०२५ या दरम्यान नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र झालेला आहे.या खेळाडूंना डॉ.महेश बेंबडे,प्रा.निशिकांत सदाफुले,प्रा. विनोद गेवरे,वैष्णवी जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

सदरील विजयी खेळाडू व मार्गदर्शकांचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर,जेईई समन्वयक प्रा.रवीकुमार, प्रा.मनोज पाटील, प्रा.शिवाजी राठोड,प्रा.शैलेश सूर्यवंशी, प्रा.मनीषा बाजपेयी, प्रा.मंजुषा कदम, प्रा.बळवंत सूर्यवंशी, प्रा.मेघा भिसे, प्रा.कल्पना गव्हाणे, प्रा.चिक्राळे, प्रा.रोहिणी हवा,प्रा. विजयकुमार मांदळे, प्रा.जाधव,प्रा.गोपाल अवस्थी, प्रा.व्यंकट कैले, प्रा.भोसले, प्रा.एस.पी.शेळगे, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,इतर शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## आंतरराष्ट्रीय मधुमेह दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन




**लातूर/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय मधुमेह दिनानिमित्त दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर यांच्या फार्माकोलॉजी विभागातर्फे क्रीडा संकुल, लातूर येथे रक्तातील साखर, रक्तदाब व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमास प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते,फार्माकोलॉजी विभागप्रमुख डॉ.रघुनाथ वडुळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यांच्यासह प्रा.शेख मोहज्जिब ,प्रा. इंगळे प्रियांका, प्रा.श्रीया शिंदे आणि प्रा. मुळे भाग्यश्री यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. एम.फार्म (फार्माकोलॉजी)च्या सर्व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनीही शिबिराच्या यशासाठी उत्साहाने सहभाग नोंदविला.

शिबिराचा उद्देश नागरिकांमध्ये मधुमेहाबाबत जागरूकता निर्माण करणे व रोगाचे लवकर निदान करून भविष्यातील आरोग्यधोके कमी करणे हा होता.या शिबिरात तब्बल २२५ नागरिकांनी तपासणी करून घेतली. तपासणीनंतर तज्ञांकडून औषधोपचार,आहार नियोजन तसेच जीवनशैली सुधारणा याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.शिबिरात सहभागी नागरिकांनी या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त करून अशाप्रकारचे आरोग्यविषयक उपक्रम सातत्याने आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

महाविद्यालया तर्फे राबविल्या जात असलेल्या या समाजोपयोगी उपक्रमा बद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदरावजी सोनवणे, सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा यांनी प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते, कार्यरत प्राध्यापक वृंद, कर्मचारी व संपूर्ण एम.फार्म (फार्माकोलॉजी) पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था, सार्वजनिक ठिकाणांच्या जवळ तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंध

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या काळात धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळ तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी निर्गमित केले आहेत.भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या या आदेशानुसार निर्गमित केलेले हे आदेश ३ डिसेंबर २०२५ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुलमध्ये 'बालदिन' उत्साहात साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये पंडीत जवाहरलाल नेहरु यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पंडीत जवाहरलाल नेहरुंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुणे श्रीकृष्ण लाटे, शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, समन्वयक रौफ शेख, समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील यांनी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शाळेच्या शिक्षिका नम्रता डांगे यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याची माहिती दिली आणि चाचा नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून साजरी केली जाते. पंडित नेहरू नेहमी म्हणायचे ''लहान वयात मुलांना योग्य मार्गदर्शन मिळाले तरच ते भविष्यात आदर्श नागरिक होऊ शकतील.'' हे त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

शाळेच्या सर्व शिक्षक, शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना बालदिनाच्या शुभेच्छा दिल्या. शाळेतील शिक्षिकांनी बाल दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन शाळेच्या शिक्षिका साक्षी मुंडे यांनी केले. या प्रसंगी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## मध्य रेल्वेने सोयीस्कर आणि जलद तिकीटिंगसाठी मोबाइल यूटीएस सहाय्यकांची सुरूवात केली

### फक्त १३ दिवसांच्या कालावधीत रु २०.३३ लाखांचे उत्पन्न नोंदवले


**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेने एटीव्हीएम, यूटीएस प्रणाली, मोबाइल यूटीएस इत्यादींच्या माध्यमातून आपल्या प्रवाशांना सुलभ तिकीटिंगची सुविधा देण्यात नेहमीच अग्रणी भूमिका बजावली आहे. या श्रेणीतील नवीनतम उपक्रम म्हणजे मोबाइल णढड सहाय्यक.

मध्य रेल्वेने ही सुविधा ३१.१०.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे सुरू केली असून, तिकिट खरेदीसाठी प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांसाठी ३ सहाय्यक नियुक्त केले आहेत. एम-यूटीएस सहाय्यक (M-UTS) म्हणून ओळखले जाणारे हे कर्मचारी, त्यांच्या सोबत एक मोबाइल फोन आणि एक लहान तिकीट प्रिंटिंग मशीन अशा दोन्ही सुविधा घेऊन फिरतात. हे एम-यूटीएस सहाय्यक कॉन्कोर्स, होल्डिंग एरिया किंवा रेल्वे परिसरात रांगेत उभ्या असलेल्या प्रवाशांकडे जाऊन, प्रवासभाडे स्वीकारून तिकीट तत्काळ जारी करतात.

पर्यायी व्यवस्था म्हणून, त्यांना काउंटरच्या आत बसून तिकीट देण्याचीही परवानगी आहे. प्रवाशांना डिजिटल किंवा रोख अशा दोन्ही प्रकारच्या पेमेंटची सुविधा उपलब्ध आहे. दि. ३१.१०.२०२५ रोजी सुरूवात







झाल्यापासून १२.११.२०२५ पर्यंत मोबाइल यूटीएस सहाय्यकांद्वारे १२,७३३ तिकिटांच्या विक्रीतून एकूण रु.२०.३३ लाखांचे उत्पन्न झाले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व्यतिरिक्त, भारतीय रेल्वेने नवी दिल्ली, कोलकाता, बेंगलुरू आणि चेन्नई या स्थानकांवरही मोबाइल यूटीएस सहाय्यकांची सुरूवात केली आहे.

तिकीटिंग अधिक सुलभ करण्यासाठी आणि प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मोबाइल यूटीएस सहाय्यकांची सुविधा ही मध्य रेल्वेचा आणखी एक महत्त्वपूर्ण पुढाकार आहे.

मोबाइल यूटीएस सहाय्यकांची सेवा ही सोयीस्कर आणि वेळेची बचत करणारी असल्याने प्रवाशांना ती वापरण्याकरिता प्रोत्साहित केले जात आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# औशात बिहार विजयाचा जल्लोष

## – औसा नगरपालिकेतही ‘कमळ’ फुलणारच – अर्चनाताई पाटील चाकूरकर
## – विकासाच्या बळावर भाजपा औसा नगरपालिकेत सत्ता स्थापन करणार – आ. अभिमन्यू पवार

**औसा/प्रतिनिधी :** बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएला मिळालेल्या भव्य विजयाचा जल्लोष औशात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष व्यक्त केला. या आनंद सोहळ्यात आमदार अभिमन्यू पवार आणि अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते पेढे वाटून विजयाचा आनंद कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी सामायिक केला.

या प्रसंगी अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी आपल्या कार्यकर्त्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण केला. त्या म्हणाल्या, बिहारच्या विजयाचा जल्लोष आपण साजरा करतो आहोत; मात्र हा उत्सव इथंच थांबणार नाही. औसा नगरपालिकेतही आपल्या विजयी भगव्या काफिल्याचा जल्लोष लवकरच सर्वत्र दिसेल. जनता विकासाला मत देते आणि औशाची जनता निश्चितच विकासाचा मार्ग निवडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनीही कार्यकर्त्यांना उत्साहात झेपावणारे प्रेरणादायी संबोधन केले. ते म्हणाले, विकासाच्या बळावर भाजपा औसा नगरपालिकेत सत्ता स्थापन करणार आहे. बिहारमधील जंगलराजाला मोदीजी आणि नितीशकुमार यांनी पूर्णविराम दिला; त्याचप्रमाणे औशातील जनता येथेही असलेले जंगलराज संपवेल, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. पवार यांच्या या वक्तव्याने उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

बिहारच्या विजयानंतर औसा शहरात उत्साहाचे वातावरण पसरले असून, भाजप कार्यकर्त्यांमध्ये आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीचा आत्मविश्वास ठळकपणे जाणवत आहे. शहरातील प्रमुख चौक, कार्यालये आणि कार्यकर्त्यांच्या भेटीगाठींमधून निवडणुकीची रंगत आणि विजयाची चाहूल स्पष्टपणे जाणवत आहे. जल्लोष, उमेद आणि विजयाच्या संकल्पाने औसा शहर सध्या राजकीय उर्जेने भारलेले दिसत आहे.यावेळी मोठ्या प्रमाणात पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## रोडच्याकडेला दोन बेस व दोन टॉप लावत (डिजेवर) मोठ्या आवाजात गाणे वाजविणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर परिसरात मोठ्या आवाजात डिजे वाजवून सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई ही सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियम व अटींचे उल्लंघन करीत मोठ्या आवाजात ध्वनीवर्धक यंत्रणेचा (डिजे) वापर करणाऱ्यांविरुद्ध करण्यात आली आहे.




दिनांक १२/११/२०२५ रोजी रात्री पोलीस ठाणे एमआयडीसी, लातूर येथील पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत मोरे व त्यांचा पथक हा हद्दीतील रात्रगस्त पेट्रोलिंगवर असताना, भक्ती शक्ती मंगल कार्यालय, रिंगरोड, खाडगाव रोड, लातूर समोर रोडच्या कडेला दोन बेस व दोन टॉप स्पीकर (डिजे साउंड सिस्टम) एका टेबलावर ठेवून मोठमोठ्या आवाजात गाणे वाजवित असल्याचे निदर्शनास आले. संबंधित डिजे सिस्टमचा मालक अनिकेत इंगळे याने हे उपकरण भक्ती शक्ती मंगल कार्यालयाचे मालक धनराज साठे यांच्या सांगण्यावरून हळदीच्या कार्यक्रमाच्या नावाखाली लावले. सदर कृतीतून सार्वजनिक शांततेचा भंग झाला असून, हे कृत्य मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनीप्रदूषण संदर्भातील आदेशांचे उल्लंघन करणारे आहे.

त्यामुळे डिजे मालक अनिकेत इंगळे व मंगल कार्यालयाचे मालक धनराज साठे या दोघांविरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी, लातूर येथे सार्वजनिक शांततेचा भंग व सर्वोच्च न्यायालय आदेशाचे उल्लंघन याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कारवाई ही श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, श्री. मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, श्री. समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत मोरे, पोलीस हवालदार सचिन गिरी, पोलीस नाईक माधव अंबेकर, पोलीस अंमलदार राम जाधव, प्रविण दुधभाते, व विश्वांभर तुरे यांनी संयुक्तपणे केली. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस नाईक ज्ञानेश्वर काळगे करीत आहेत.

**नागरिकांना आवाहन :**

**लातूर पोलीस विभागाकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे. विहित वेळेनंतर अथवा विना परवाना कोणत्याही प्रकारे डिजे, साउंड सिस्टीम, वाद्य, स्पीकर इत्यादींचा मोठ्या आवाजात वापर करू नये. असे आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस विभागास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.**

## पाचव्या दिवशी ७१ उमेदवारांनी भरले नामनिर्देशन पत्र; ६ नगराध्यक्ष तर ६५ नगरसेवक पदासाठी

**निलंगा/प्रतिनिधी :** निलंगा नगरपालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुक उमेदवारांचे सोमवारी दिनांक १० नोव्हेंबर पासून तहसील कर्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करून घेण्यात सुरुवात झालेली आहे. यासाठी संबंधित प्रशासनाने नामनिर्देशन कक्षाची पहिल्या दिवशी पासूनच पूर्ण तयारी केलेली आहे. मात्र दि. १० नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबर रोजी म्हणजे चार दिवस एकही नाम निर्देशन पत्र दाखल झाले नव्हते. मात्र पाचव्या दिवशी म्हणजे दि. १४ नोव्हेंबर रोजी ६ नगराध्यक्ष पदासाठी तर ६५ नगरसेवक पदासाठी असे एकूण ७१ इच्छुक उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी दिली. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष लोमटे, कुलदीप देशमुख, नामनिर्देशन नोडल अधिकारी ए. आर. मौजन, डिगंबर साठे, यांच्यासह संबंधित अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.



## महाराष्ट्रातील खासगी प्रसूती रुग्णालयांसाठी आरोग्य विभागाचा ‘लक्ष्य-मान्यता’ उपक्रम

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील खासगी प्रसूती रुग्णालयांमध्ये सेवा गुणवत्ता वाढवून प्रसुतीदरम्यान होणाऱ्या मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने लक्ष्य-मान्यता हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

हा उपक्रम राज्यातील सर्व खासगी रुग्णालयांमध्ये दर्जात्मक, सुरक्षित आणि आदरयुक्त प्रसूती सेवा (ठशीशिलींर्षीश्र चरींशीपळीूं उरीश) सुनिश्चित करण्यासाठी राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राने मागील काही वर्षांत मातामृत्यू कमी करण्यामध्ये उल्लेखनीय प्रगती केली असून, आता हा प्रयत्न खासगी क्षेत्रापर्यंत विस्तारित करण्यात आला आहे.

लक्ष्य-मान्यता कार्यक्रमाचा मुख्य हेतू प्रसूतीदरम्यान माता आणि नवजात बालकांचे मृत्यूदर कमी करणे, खासगी रुग्णालयांमधील सेवा गुणवत्ता, रुग्ण सुरक्षा आणि रुग्ण काळजीत सुधारणा करणे, प्रत्येक महिलेला सुरक्षित व आदरयुक्त प्रसूती अनुभव मिळवून देणे आहे.

हा उपक्रम महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग, फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॉकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया आणि गहळिशसे या आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे.

Jhpiego संस्थेमार्फत फॉग्सी आणि खासगी रुग्णालयांना आवश्यक तांत्रिक सहाय्य, प्रशिक्षण आणि मूल्यांकन सहाय्य पुरविले जाणार आहे.

### लक्ष्मण रेखा

अनुभव दे निवडणूका
धडा निमीत्ताने शिका
जनसेवेच्याआनंदापुढे
विजयाचा पेढा फिका

अनपेक्षितपणेकैकदा
सु खद दुःखद धक्का
एक तर शाश्वत हवेचं
जनसेवानिर्धारपक्का

करत असताना टिका
रे आखा लक्ष्मण रेखा
मोकळेपणेस्विकारावे
पदरातपडलेले जे का

जाणीव दिली जनतेने
कर्तव्या सोबत हक्का
अभिनंदन हो जेत्यांचे
कपाळे लावावा टिका

विजयश्री मिळे जेंव्हा
मन मयूर करतो केका
मलाचं मिळावी सत्ता
कधी तरी सोडा हेका

आपले कुटुंबात सत्ता
सोडायचा हेकट ठेका
उचित उमेदवारां कधी
नक्कीचं मिळो मोका

दुज्यांच्या सुखातसुख
आनंदनसे या सारखा
दुज्यांच्या दुःखा दुःख
आपला होणारं परका

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.


**NAME OF CHANGE DECLARATION**

Here in this Advertise I am Declaring that I have Change My Name Which Was Earlier: SAVITA SUDHAKAR CHAPOLIKAR
To: SAVITA SUDHAKARRAO MADREWAR
Hence for this Declaration i will be known by this name and will use SAVITA SUDHAKARRAO MADREWAR
future the same name will used by my family husband/wife, children and relative.
OLD NAME - SAVITA SUDHAKAR CHAPOLIKAR
NEW NAME - SAVITA SUDHAKARRAO MADREWAR
Address - LAXMINARAYAN NIVAS NEAR KAVHA ROAD MANTHALE NAGAR LATUR 413 512
Mob No.+91 9404180581

**NAME OF CHANGE DECLARATION**

Here in this Advertise I am Declaring that I have Change My Name Which Was Earlier: SHRIRANG SUDHAKAR CHAPOLIKAR
To: SHRIRANG SUDHAKARRAO MADREWAR
Hence for this Declaration i will be known by this name and will use SHRIRANG SUDHAKARRAO MADREWAR
future the same name will used by my family husband/wife, children and relative.
OLD NAME - SHRIRANG SUDHAKAR CHAPOLIKAR
NEW NAME - SHRIRANG SUDHAKARRAO MADREWAR
Address - LAXMINARAYAN NIVAS NEAR KAVHA ROAD MANTHALE NAGAR LATUR 413 512
Mob No.+91 9420872400

**NAME OF CHANGE DECLARATION**

Here in this Advertise I am Declaring that I have Change My Name Which Was Earlier: SUDHAKAR CHAPOLIKAR
To: SUDHAKARRAO MADREWAR
Hence for this Declaration i will be known by this name and will use SUDHAKARRAO MADREWAR
future the same name will used by my family husband/wife, children and relative.
OLD NAME - SUDHAKAR CHAPOLIKAR
NEW NAME - SUDHAKARRAO MADREWAR
Address - LAXMINARAYAN NIVAS NEAR KAVHA ROAD MANTHALE NAGAR LATUR 413 512
Mob No.+91 9422639067

**NAME OF CHANGE DECLARATION**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKH HABJB SATTAR TO SHAIKH HABIB ABDUL SATTAR.
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the SHAIKH HABIB ABDUL SATTAR. will used by my family husband / wife, children and relative.
OLD NAME :- SHAIKH HABIB SATTAR.
NEW NAME:- SHAIKH HABIB ABDUL SATTAR.
Address :- KILLA GALLI, MAIN ROAD,SGERKHA GALLI,UDGIR TA. UDGIR. DIST. LATUR.- 413518.
Adhar no.-895566830737
Mob. No.-9921474777

**मध्य रेल्वे**
**अभियांत्रिकी विभाग**
**अभियांत्रिकी कामे**
**ई-निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) मध्य रेल्वे सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. **निविदा क्रमांक:** SUR/TD/T/2025/27 **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील होटगी येथे इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हच्या तपासणी आणि देखभालीसाठी ट्रिप देखभाल/आगाऊ तपासणी केंद्रे तयार करण्याच्या संदर्भात कामाचा इलेक्ट्रिकल TRD भाग. **अंदाजे खर्च:**- ४३,८६,३२८.४३/-, **बोली सुरक्षा:**- ८७,७००/- **काम पूर्णता कालावधी:**- १२ महिने, **ऑफरची वैधता:**- ६० दिवस, **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:**- ०५/१२/२०२५ रोजी १५:०० वाजता.

SUN 88 **वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)**

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

**मध्य रेल्वे**
**अभियांत्रिकी विभाग**
**अभियांत्रिकी कामे**
**ई-निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता,मध्य रेल्वे, सोलापूर आणि भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत. **निविदा क्रमांक:** SUR/L/T/2024/30R2 **कामाचे नाव:** वाडी यार्डचे अ वर्ग मालवाहतूक परीक्षा यार्डमध्ये अपग्रेडेशन करण्याच्या संबंधात कामाचा विद्युत सामान्य सेवा भाग. **अंदाजे खर्च:** १,११,७७,४३३.४८/-, **बोली सुरक्षा:** २,०८,९००/- **काम पूर्णता कालावधी:** -१२ महिने, **ऑफरची वैधता:** ६० दिवस, **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** ०८/१२/२०२५ रोजी १५:०० वाजता. बोली सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरावा लागेल.

SUN 89 **वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य)**

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवीत आहेत.

**निविदा सूचना क्रमांक 40-2025-SrDENC**
**कामाचे नाव** १-ADEN/BG/KWV उपविभागांतर्गत झथख कार्यालय आणि स्टोअरचे बांधकाम आणि ADEN/BG/KWV आणि IOW/KWV/BG कार्यालय आणि स्टोअरचे वाढीकरण. २-ADEN/BG/KWV उपविभागांतर्गत BGVN येथे स्टोअर सुविधांसह नवीन PWI कार्यालय डेपोचे बांधकाम. **कामाची अंदाजे किंमत** रु. ५७०२९५१४.७२/-, **बयाना रक्कम** - रु. ४३५२००.००/-, **काम पूर्ण करण्याचा कालावधी** - १२ महिने, **देखभाल कालावधी** - २४ महिने.

**निविदा सूचना क्रमांक 41-2025-SrDENC**
कामाचे नाव - लातूर कोचिंग कॉम्प्लेक्ससाठी सर्व्हिस रूमचे बांधकाम. **कामाची अंदाजे किंमत** रु. १४३००९७५.१६/-, **बयाणा रक्कम** रु. २२१५००.००/-, **काम पूर्ण करण्याचा कालावधी** १२ महिने, **देखभाल कालावधी** २४ महिने.

www.ireps.gov.in **वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ** ०५/१२/२०२५ दुपारी १५:०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ** ०५/१२/२०२५ दुपारी १५:३० वाजेपर्यंत. **संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत कोणतेही बदल/शुद्धीपत्रक जारी केले आहे ते लक्षात घेता येईल.** वेबसाइट: www.ireps.gov.in.

SUN 90 **विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर**

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**


विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. **निविदा सूचना क्रमांक १४-२०२५ एसआरडीईएनसीओ, कामाचे नाव-** कुर्डुवाडी (बीजी) उपविभाग दौंड (वगळून) ते कुर्डुवाडी (समावेश) या क्षेत्रासाठी वार्षिक विभागीय करार ज्यामध्ये कुर्डुवाडी कार्यशाळा ढवळास, भालवणी, पोपलाज, वाशिंबे, पारेवाडी, जिंती, मलठण, बोरीबेल, भिगवण, केतूर, जेऊर, केम इत्यादी सेवा इमारत, कार्यालयीन इमारत आणि कर्मचारी वर्ग (वर्ष: २०२६-२७, २०२७-२८ २०२८-२९, २०२९-३०). झोन ‘C’ ADEN/W/SUR उपविभाग कुर्डुवाडी (वगळून) ते दुधनी (समाविष्ट) वडसिंगे, माढा, अंगार, वाकाव, मलिकपेठ, मोहोळ, बढे, अकोलकोट रोड, पाकणी, तितलाटी, होटगी इत्यादीसाठी वार्षिक विभागीय करार सेवा इमारत, कार्यालयीन इमारत आणि कर्मचारी वर्ग. (वर्ष: २०२६-२७, २०२७-२८ २०२८-२९, २०२९-३०). झोन ‘D’ADEN/KLBG उपविभाग दुधनी (वगळून) ते वाड (समाविष्ट) शहाबाद, मार्तूर, हिरेनांदुरू, कलबुर्गी, बाबलाद, कुलाली, ताजसुलतानपूर इत्यादींसाठी सेवा इमारत, कार्यालयीन इमारत आणि कर्मचारी वर्गासाठी वार्षिक विभागीय करार. (वर्ष: २०२६-२७, २०२७-२८ २०२८-२९, २०२९-३०). झोन ‘E’ ADEN/LUR उपविभाग कुर्डुवाडी (वगळून) ते लातूर रोड (वगळता) शेंद्री, कळमरूड, हरंगुळ, ढोकी, येडशी, धाराशिव, बार्शी टाउन, पांगरी, लातूर इत्यादींसाठी सेवा इमारत, कार्यालयीन इमारत आणि कर्मचारी वर्गासाठी वार्षिक विभागीय करार. (वर्ष: २०२६-२७, २०२७-२८ २०२८-२९, २०२९-३०). झोन ‘F’ ADEN/PVR उपविभाग कुर्डुवाडी (वगळून) ते मिरज (वगळून) पंढरपूर, मोडलिंब, सांगोला, जठ रोड, धलगाव, सलगरे, कौठेमहाकाळ, आरग इत्यादींसाठी सेवा इमारत, कार्यालयीन इमारत आणि कर्मचारी वर्गासाठी वार्षिक विभागीय करार. (वर्ष: २०२६-२७, २०२७-२८ २०२८-२९, २०२९-३०). **कामाची अंदाजे किंमत** रु. ३६०००४८०५.२०/-, **बयाणा रक्कम** - रु. १९५००००.००/-, **काम पूर्ण करण्याचा कालावधी** - ४८ महिने, **देखभाल कालावधी** ०६ - महिने. **www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ** - १४-२०२५ SrDENCO-०८/१२/२०२५ रोजी १५:०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ**-१४-२०२५-SrDENCO-०८/१२/२०२५ रोजी १५:३० वाजता. **संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल.** **वेबसाइट: www.ireps.gov.in.**

SUN 87 **विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर**

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

**निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र**
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

**टोनर रिफिलिंग**



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
**प्रिंटर्स पॅराडाईस**
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६